# कृषीवल

रायगड, बुधवार, दि. १ जानेवारी २०२५

किंमत ४ ₹


नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा



## हे नववर्षा!

सरते वर्ष ३१/१२/२०२४रोजी
रात्री १२.०० वाजता राजीनामा देईल
यानंतर नव वर्षा तुझे राज्य येईल
नवतेचे स्वागत करणेही परंपरा आहे
ते करण्यास सर्वजण जय्यत आहेत
हे नव वर्षा! जाणारे वर्ष गेले
आता येथे तुझेच राज्य आले
आम्ही पामर तुझ्याकडून एवढेच मागतो
सर्वांच्या हातांना काम दे,
भुकेलेल्याला पोटभर अन्न दे,
अनाथाला मायेची ऊब दे,
अंधाला प्रकाशाची वाट दाखव,
अपंगाला स्वसामर्थ्याचे बळ दे,
पावसापाण्याचे गणित बरोबर कर,
हलधराच्या कष्टाला बरकत दे,
बळीराजाचा बळी जाणार नाही
याची काळजी घे!
बलात्कार, अत्याचारापासून
आयाबहिणींचे रक्षण कर
धनिकांना, गरीबांना मदत करण्याची बुद्धी दे,
जनतेचे भले करण्यासाठी राज्यकर्त्यांना शक्ती दे
भारतभूमीत शिवशाही येऊ दे,
रयतेला सुखाने व निर्भयतेने जगू दे!
-शिरीष म्हात्रे, गोवठणे-उरण

● (छायाचित्र : सुधीर नाझरे)

# उत्साह अन् जल्लोष

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

**दिवसभर स्वागताची तयारी... उत्कंठा शिगेला पोहोचलेली... क्षणाक्षणाला तरुणांचा वाढता जल्लोष... आकर्षक विद्युत रोषणाईचा लखलखाट... अशा उत्साही वातावरणात घड्याळातले दोन्ही काटे १२ वर येऊन थांबले आणि सर्वत्र 'हॅप्पी न्यू इअर'चा एकच जल्लोष झाला. नंतर तासभर सुरू होता तो शुभेच्छांचा वर्षाव आणि उत्साहाचा महोत्सव.**

२०२४ या मावळत्या वर्षाला निरोप देत २०२५ या नववर्षाचे स्वागत रायगडकरांनी मंगळवारी मध्यरात्री केले. थंडीचा कडाका असतानाही स्वेटर-कानटोपी व अंगावर शाल पांघरून आबालवृद्ध नववर्ष स्वागतात रममाण झाले होते. संगीतमय कार्यक्रम, फटाक्यांची आतषबाजी आणि पार्ट्यांनी रात्री उशिरापर्यंत शहरासह समुद्रकिनारे गजबजलेले होते.

तरुण असो की वृद्ध, पण बहुतेक सर्वांमध्येच थर्टी फर्स्टची क्रेझ असते. एरवी कधी न घेणारे आपण फक्त थर्टी फर्स्टला घेतो, असे अभिमानाने सांगतात. त्यामुळे मंगळवार त्यांचाही दिवस होता. ३१ डिसेंबरच्या सकाळपासूनच रात्रीची तयारी सुरू झाली होती. मटण-चिकनच्या दुकानात जशा रांगा होत्या, तशीच गर्दी दारुच्या दुकानातही होती. त्यामुळे या दुकानात काम करणाऱ्यांना मंगळवारी अवांतर बोलण्याचीही फुरसत नव्हती. ●> पान २ वर

### पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त

चौका-चौकात पोलीस उभे होते. पोलिसांनीही शुभेच्छा देत नागरिकांचे स्वागत केले; पण त्याचवेळी दारू पिऊन गाडी चालविणाऱ्यांच्या वाट्याला कारवाईचे काटेही आले. नववर्षाच्या स्वागतासाठी कॉलनीतल्या लोकांनी एकत्र येऊन नववर्ष स्वागत करणाऱ्यांचे प्रमाणही मोठे होते. या स्वागतात घरच्या गृहिणी अन् मुलेही सहभागी झाली होती.

### ५२ जणांना एकदिवसीय परवाना

नववर्षाच्या स्वागतासाठी अनेक ठिकाणी पार्ट्यांचे आयोजन करण्यात आले होते. रायगड जिल्ह्यात एकदिवसीय दारुविक्रीसाठी ५२ जणांनी परवाने घेतले असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून देण्यात आली होती.

### गुडबाय २०२४

सरत्या वर्षातील दुःखद गोष्टी विसरून नवीन वर्षाच्या स्वागताचा उत्साह ओसंडून वाहत होता. ग्रामीण भागात मध्यरात्री एक वाजेपर्यंत दारुविक्री करण्याची परवानगी असल्याने मद्यपींनी रात्री उशिरा शहराकडे आपला मोर्चा वळविला. शासनाच्या नियमानुसार शहरात पहाटे पाचपर्यंत दारुविक्री करण्याची परवानगी दिली होती. नववर्षाच्या निमित्ताने काही हॉटेलांमध्ये मनोरंजन कार्यक्रम सुरू होते. सेलिब्रेशनच्या पार्ट्या खऱ्या अर्थाने रात्री आठनंतर सुरू झाल्या. रात्री बारा वाजता समुद्रकिनारी 'हॅप्पी न्यू इयर' म्हणत तरुणांनी सरत्या वर्षाला गुडबाय करून येणाऱ्या नववर्षाचे वेलकम करताना हे वर्ष सुखासमाधानात जाण्याच्या शुभेच्छाही एकमेकांना दिल्या.

# कोपरखैरणेत इमारतीचा स्लॅब कोसळला

## नवी मुंबई पालिकेकडून पाणी, विद्युतपुरवठा खंडित

**| उरण | वार्ताहर |**

कोपरखैरणे सेक्टर ७ येथील सम्राट सोसायटीच्या पहिल्या मजल्यावरील स्लॅब शनिवारी सायंकाळी कोसळला. यामध्ये सुदैवाने कोणीही जखमी झाले नाही. भविष्यात अशा प्रकारची दुर्घटना टाळण्यासाठी रविवारी सकाळी विद्युत आणि पाणीपुरवठा खंडित करून पालिका प्रशासनाने इमारत रिकामी करण्यास रहिवाशांना सांगितले.

प्लॉट नंबर १२ वर सम्राट सोसायटी या तीन मजली इमारतीचे बांधकाम २००० मध्ये करण्यात आले आहे. शनिवारी सायंकाळी सहाच्या सुमारास पहिल्या मजल्यावरील स्लॅबचा काही भाग तळमजल्यावरील घरात कोसळला. सुदैवाने ज्या ठिकाणी स्लॅब कोसळला, तेथे कोणीही नव्हते. या दुर्घटनेनंतर पालिका प्रशासनाने रहिवाशांना तात्काळ ●> पान २ वर

### पावसाळ्यापूर्वीच नोटीस

इमारतीमध्ये १६ सदनिका असून, जवळपास ४५ नागरिक वास्तव्य करीत आहेत. इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करून घेण्याची नोटीस महानगरपालिका प्रशासनाने पावसाळ्यापूर्वीच दिली होती.

# तृतीयपंथियांकडून वेश्याव्यवसाय

**| पनवेल | वार्ताहर |**

पनवेल तालुक्यातील विविध ठिकाणच्या पोलीस हद्दीसह इतर विविध सार्वजनिक ठिकाणी रात्री उशिरापर्यंत तृतीयपंथीयांकडून बिनधास्तपणे अश्लील वर्तन करून वेश्याव्यवसायासारखे अनैतिक प्रकार केले जात असल्याने याबाबत स्थानिक रहिवाशांनी संताप व्यक्त केला आहे. या ठिकाणी पोलिसांनी कारवाई करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

अनेक ठिकाणी तृतीयपंथी हे अश्लील कृत्य व वेश्याव्यवसाय करीत असताना ●> पान २ वर

# खैरतस्कर गजाआड



**| पोलादपूर | प्रतिनिधी |**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरून राजापूर ते गुजरात अशी खैरतोडीनंतर काताच्या अर्काचे २४० ड्रम्स भरलेल्या ट्रकसह खैरतस्करांना महामार्ग वाहतूक पोलिसांच्या सतर्कतेमुळे गजाआड करण्यात यश आले आहे. महामार्गावरील वनविभागाच्या वनउपज तपासणी नाक्यातील वनकर्मचाऱ्यांच्या डोळ्यात धूळफेक करण्यात यशस्वी झालेल्या खैरतस्करांना अटक करण्यात आली आहे. महाड आणि पोलादपूरदरम्यान मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर हा ट्रक आणि चालक महाड एमआयडीसी पोलिसांना ताब्यात घेण्यात यश ●> पान २ वर

# भीषण अपघातात तरुणाचा मृत्यू

**| पनवेल | वार्ताहर |**

भिंगारी गाव येथील पनवेलकडे येणाऱ्या सर्विस रोडवर महावितरणच्या कार्यालयाजवळ भरधाव वेगाने आलेल्या कारने इलेक्ट्रिक स्कुटीला दिलेल्या धडकेत दोघेजण जखमी झाले होते. यातील सुशील दत्ताराम पवार याचा नुकताच मृत्यू झाला. या अपघातप्रकरणी किया कार क्रमांक एमएच ०५ ईए ५१९३ वरील चालकाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सचिन कोनकर (रा. काळुंद्रे गाव) ●> पान २ वर

आरटीओच्या ई-प्रणाली नियमाच्या धोरणामुळे अडचण | वेगमर्यादेवर निर्बंध आणून रुग्णांच्या जीवाशी खेळ सुरू; रुग्णवाहिका संघटनेकडून निषेध व्यक्त

# रुग्णवाहिकांच्या वेगाला लगाम?


**| पनवेल | वार्ताहर |**

रुग्णवाहिका ही अत्यावश्यक सेवेमध्ये मोडत असून, तिच्यावर वेगमर्यादाचे नियंत्रण आणले जात असल्यामुळे आगामी काळात रुग्णवाहिका सेवा अडचणीत येण्याची शक्यता आहे.

आरटीओच्या ई-प्रणाली नियमामुळे रुग्णवाहिकाच्या वेगाला लगाम लागणार आहे. या लगामामुळे रुग्णाचा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी रुग्णांना नेताना रुग्ण सिरीयस कंडिशन होण्याचे किंवा मृत्यूचे प्रमाण वाढणार आहे. या घडणाऱ्या दुर्घटनेला आरटीओ प्रशासन जबाबदार राहील. त्याची नोंद प्रशासनाने घ्यावी. कारण रुग्णाला एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेताना रुग्णवाहिका वेग ई-चलन दंड आकारत आहे. आरटीओ प्रशासनने रुग्णवाहिकांसाठी लागणारे ई-चलन दंड बंद करण्यासाठी गांभीर्याने विचार करावा, अशी मागणी महाशक्ती रुग्णवाहिका असोसिएशन महाराष्ट्र राज्य संघटनेने केली आहे. रायगड जिल्ह्यासाठी शासनाकडून १०८ क्रमांकाच्या २३ रुग्णवाहिका देण्यात आल्या असून, अन्य रुग्णवाहिकांची संख्या शेकडोंच्या घरात आहे.




> रुग्णवाहिकेला वेगमर्यादा लावल्याने रुग्ण हॉस्पिटला पोहोचायला उशीर होईल. त्यामुळे रुग्णाचा जीव धोक्यात येऊ शकतो. त्यामुळे आम्ही रुग्णाच्या जीवाशी खेळू शकत नाही. वेगमर्यादेचा रुग्णवाहिकेला दंड आकरण्याच्या नियमाचा निषेध करतो. जर निर्णय बदलला नाही, तर भारतभर रुग्णवाहिकेचे चालक मालक रुग्णसेवा बंद करतील.
>
> – मुकुंद कांबळे, जिल्हा कार्याध्यक्ष, महाशक्ती ॲम्ब्युलन्स असो. महाराष्ट्र



# सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालकपदी राहुल कर्डिले



**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालकपदाचा कार्यभार राहुल कर्डिलेयांनीपूर्वीचेसहव्यवस्थापकीय संचालक दिलीप ढोले यांच्याकडून ३१ डिसेंबर रोजी सिडको भवन येथे स्वीकारला.

राहुल कर्डिले हे सन २०१५ च्या तुकडीतील महाराष्ट्र कॅडरचे भारतीय प्रशाकीय सेवा (आयएएस) अधिकारी आहेत. राहुल कर्डिले हे अभियांत्रिकी (इन्स्ट्रूमेन्टेशन) पदवीधर आहेत. यापूर्वी त्यांनी अधिसंख्य सहाय्यक जिल्हाधिकारी, अमरावती, सहाय्यक जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी, सेलू, जि. परभणी, मुख्य कार्यकारी अधिकारी, चंद्रपूर जिल्हा परिषद आणि सहआयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए), मुंबई ही पदे भूषवली आहेत. सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालक पदाचा कार्यभार स्वीकारण्यापूर्वी राहुल कर्डिले हे जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी, वर्धा म्हणून कार्यरत होते.

वर्धा येथे जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत असताना राहुल कर्डिले यांनी तालुका स्तरापर्यंत ई-कार्यालय या उपक्रमाची अंमलबजावणी केली होती. ई-कार्यालय उपक्रमाची तालुका स्तरापर्यंत अंमलबजावणी करणारा वर्धा हा महाराष्ट्रातील पहिला जिल्हा ठरला होता. सेवादूत उपक्रमांतर्गत ग्रामस्तरीय उद्योजका (व्हीएलई) मार्फत ऑनलाइन प्रक्रिया राबवून नागरिकांना घरपोच सेवा देण्याचा पथदर्शी प्रकल्पही त्यांनी राबविला होता. नागरिकांकरिता ९० अधिकच्या सेवा अधिसूचित करणे, ९० सेवांपैकी २७ सेवा या ऑनलाइन आरटीएस पोर्टलच्या माध्यमातून त्यांनी उपलब्ध करून दिल्या होत्या. तसेच वर्धा जिल्ह्यातील ९६ दुष्काळी गावांतील ९० कि.मी. च्या नाल्याचे खोलीकरण व नाल्याच्या काठाने बांबूची लागवड, वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला पुनरुज्जीवित करण्याचा प्रयत्न इ. उपक्रम त्यांनी वर्धा येथे राबविले होते.

## पान १ वरून

### कोपरखैरणेत इमारतीचा स्लॅब कोसळला

इमारत खाली करावी, अशा सूचना दिल्या आहेत. इमारतीचा वीज व पाणीपुरवठा खंडित करण्याची कार्यवाही केली. रहिवाशांनी इमारत खाली करण्यासाठी मुदत मिळावी, असा अर्ज पालिकेस दिला आहे. पालिकेने वीज, पाणीपुरवठा खंडित केला आहे.

### भीषण अपघातात तरुणाचा मृत्यू

हा आणि त्याचा मित्र सुशील पवार (२८) हे काळुंद्रे गाव येथून पनवेल येथे मित्राच्या घरी कामानिमित्त इलेक्ट्रिक स्कुटी क्रमांक एमएच ४६ सीजे १८१७ वरून रात्री पावणे बाराच्या सुमारास जात होते. भिंगारी गाव येथील पनवेलकडे येणाऱ्या सर्विस रोडवर महावितरण कार्यालयाजवळ आले असता समोरून येणाऱ्या किया कार क्रमांक एमएच ०५ इए ५१९३ या कारवरील चालकाने भरधाव वेगाने येऊन स्कुटीला जोरदार धडक दिली. या अपघातात सचिन याच्या हाताच्या खांद्याला व उजव्या पायाच्या मांडीला दुखापत झाली, तर सुशील पवार हा जखमी झाला. त्यांना उपचारासाठी एमजीएम हॉस्पिटल, कामोठे येथे दाखल करण्यात आले. या अपघातात सुशील पवार याचा मृत्यू झाला. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

### उत्साह अन् जल्लोष

पोलिसांच्या ड्रंक अँड ड्राइव्ह मोहिमेमुळे अलीकडच्या काळात न्यू इअर सेलिब्रेशन घरच्या घरी करण्याचे किंवा कुठेतरी मुक्कामी राहून करण्याचे प्रमाण गेल्या काही वर्षात वाढले आहे. अशा लोकांनी सकाळीच वाइन शॉप गाठून रात्रीची सोय करून ठेवली होती. प्रशासनानेच परवानगी दिलेली असल्याने रात्री उशिरापर्यंत त्यांना अधिकृतपणे व्यवसाय करता येत होता.

नव वर्षाच्या जल्लोषालाठी तरुणाईने समुद्रकिनारी तसेच नाईट पार्ट्यांना पसंती दिली होती. १२ च्या ठोक्याला सर्वत्र एकच जल्लोष झाला. रंगीबेरंगी फटाक्यांनी आकाश उजळून निघाले. ओळखीचा असो वा नसो पण प्रत्येकजण प्रत्येकाला शुभेच्छा देत होता. पोलिस त्यांच्यावर नजर ठेवून होते, पण एकूण उत्साह पाहता त्यांनीही पाश सैल केले होते.

### तृतीयपंथियांकडून वेश्याव्यवसाय

मिळून येत आहेत. त्यामध्ये कळंबोली स्टील मार्केट परिसर जेथे ट्रक उभे केले जातात त्या ठिकाणी, आसुडगाव परिसर, सायन-पनवेल महामार्ग, खांदा वसाहत, खारघर परिसर आदी ठिकाणी मोठ्या प्रमाणात बेलपाडा हायवे, कळंबोली हायवे व ट्रक टर्मिनल येथे उभ्या असलेल्या ट्रकच्या मागे सायंकाळनंतर ते रात्री उशिरापर्यंत तृतीयपंथी लोक सार्वजनिक ठिकाणी अतिशय बीभत्सपणे बिनधास्त अश्लील वर्तन, वेश्याव्यवसायसारखे अनैतिक प्रकार करत असतात. या प्रकारांमुळे त्या परिसराची नाहक बदनामी होत आहे. सदर तृतीयपंथीयांकडून चालणाऱ्या अनैतिक कृत्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

### खैरतस्कर गजाआड

आले आहे. वनविभागाच्या मदतीने कायदेशीर कारवाई करण्यात आली.

पोलादपूर शहराबाहेरील ग्रामीण रूग्णालयालगत पोलादपूर वनउपज तपासणी नाका असून, यावर्षाच्या प्रारंभीच याठिकाणी मोठ्या प्रमाणावर खैर झाडाच्या खोडातील गाभ्याची वाहतूक करणारा ट्रक वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी पकडला होता. यानंतर कोकणाकडे दरवर्षी महाड आणि पोलादपूर तालुक्यांतील खैराची वाहतूक करून सोलीव लाकडाची वाहतूक करण्यासाठी गावोगाव एजन्ट नेमल्यासारखे खैरतस्कर हे चोराटी निर्यातीचे काम करू लागले असताना अचानक महामार्गावरील खैराची वाहतूक ठप्प झाल्याचे दिसून येत होते.

नातळाच्या सुट्टीनंतर मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर परतीच्या प्रवासाची वाहनांची दाटी वाढली असताना पोलादपूरच्या अंडरपास हायवेमधून ग्रामीण रूग्णालयालगत वनउपज तपासणी नाक्यासमोरून निळ्या रंगाचे ड्रम्स भरलेला एक ट्रक लिलया बिनबोभाटपणे वनपाल बाजीराव पवार आणि सहकाऱ्यांना कोणताही सुगावा न लागू देता गुरूवारी सकाळी मुंबईच्या दिशेने रवाना होण्यात यशस्वी झाला.

यानंतर महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील राजेवाडी, भोर आणि सावित्री पुलाजवळ उभे राहून वाहनांची तपासणी करणारे पोलीस हवालदार तेजस कदम व पोलीस हवालदार नारायण शिर्के यांनी यांनी टाटा ट्रक अडविल्यानंतर एका ट्रकमध्ये २४० निळे ड्रम्स संशयास्पद वाटल्याने वनक्षेत्रपाल राकेश साहू यांना कळविले. यावेळी महाड एमआयडीसीचे पोलीस निरीक्षक जीवन माने आणि राकेश साहू यांनी २४० ड्रम्स खैरकाताच्या अर्कासह ट्रक आणि ट्रक चालकास ताब्यात घेतले. या अवैध वाहतूकप्रकरणी पोलीस आणि वनविभागामार्फत कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे. खैरतस्करांच्या या खैर काताच्या अर्काची वाहतूक करण्याच्या नव्या शक्कलीमुळे पोलादपूर व महाड येथील वनविभागाच्या डोळ्यात धूळफेक करून ट्रक राजापूर येथून गुजरातकडे रवाना होणार असल्याची माहिती प्राप्त झाली असली तरी या सर्व प्रकारात पोलीस आणि वनविभागाने समन्वयाने केलेल्या कारवाईचे यश पाहता यापूर्वी अनेक ट्रक्समधून ड्रमद्वारे खैर कात अर्काची वाहतूक करण्यात खैरतस्कर यशस्वी झाले असल्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# भाजी विक्रेत्याला चाकूचा धाक दाखवून लुटले

**। पनवेल । वार्ताहर ।**

एका भाजी विक्रेत्याला कारमधील चौघा लुटारूंनी चाकूचा धाक दाखवून तसेच मारहाण करून त्याच्या जवळची रोख रक्कम तसेच मोबाईल फोन लुटून पलायन केल्याची घटना कामोठे परिसरात घडली आहे. कामोठे पोलिसांनी या प्रकरणातील अज्ञात चौकडीविरोधात गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे.

या प्रकरणातील तक्रारदार अमरिशचंद्र जयस्वाल (४०) हे कामोठे सेक्टर-१० मध्ये राहतात. त्यांचा कामोठे सेक्टर-१९ मध्ये भाजी विक्रीचा व्यवसाय आहे. जयस्वाल हे दरदिवशी पहाटेच्या सुमारास एपीएमसी मार्केटमध्ये जाऊन भाजीपाला खरेदी करून आणतात. पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास ते नेहमीप्रमाणे आपल्या मोटारसायकलने कामोठे सेक्टर- ६ मधील मानसरोवर हॉटेल येथे गेले. त्यानंतर तिथे आपली मोटारसायकल उभी केल्यानंतर ते एपीएमसी मार्केट येथे जाण्यासाठी मुंबई-पुणे मार्गावरील कामोठे ब्रिज लगतच्या सिग्नलजवळ वाहन चालकाकडून लिफ्ट घेण्यासाठी थांबले.

दरम्यान, एका कार चालकाने जयस्वाल यांना आपल्या कारमध्ये बसवल्यानंतर कारमध्ये बसलेल्या तिघा लुटारूंनी जयस्वाल यांना शिवीगाळ करून मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यानंतर तिघा लुटारूंनी जयस्वाल यांना चाकू व इतर शस्त्रांचा धाक दाखवून त्यांच्याकडे असलेली ३५ हजारांची रक्कम आणि मोबाईल फोन काढून घेतला. त्यानंतर त्यांनी जयस्वाल यांना पुरुषार्थ पेट्रोल पंपाजवळ गाडीतून खाली ढकलून देऊन तेथून पळ काढला. या प्रकारानंतर जयस्वाल यांनी प्रथम आपले घर गाठले. त्यानंतर कामोठे पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली.


## पनवेल महानगरपालिका

ता.पनवेल, जि.रायगड पिन नं- ४१० २०६

### जाहिर प्रकटन

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नागरीकांना सूचित करणेत येते की, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्र. १५५/२०११ मध्ये वेळोवेळी दिलेल्या आदेशात सार्वजनिक/खाजगी जागेवर, इमारतींवर लावण्यात आलेले अनधिकृत जाहिरात, होर्डिंग्ज, फ्लेक्स, बॅनर, फलक इ. वर तातडीने कारवाई करणेचे आदेश दिलेले आहेत. तरी सर्व नागरीक/संस्था/ मंडळ/राजकिय पक्ष इ. सुचित करणेत येते कि, शहरामध्ये विनापरवानगी लावणेत आलेले जाहिरात, होर्डिंग्ज, फ्लेक्स, बॅनर, फलक इ. तसेच भिंती रंगवुन जाहिरात करु नयेत. तसेच झाडावर कोणत्याही प्रकारची जाहिराती लावुन इजा पोहचू नये. अन्यथा संबंधितांवर सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरण प्रतिबंध कायद्याअंतर्गत फौजदारी कारवाई करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये विनापरवानगी जाहिरात, होर्डिंग्ज, फ्लेक्स, बॅनर, फलक इ. लावलेचे आढळल्यास त्याची माहिती देणेकरीता नागरीकांना नावानिशी किंवा निनावी तक्रार नोंदविण्याकरीता पनवेल महानगरपालिकेने खालीलप्रमाणे सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत.

**टोल फ्री क्रमांक :-** १८००-२२७-७०१
**ई- मेल :-** panvelcorporation@gmail.com
**व्हॉट्सअॅप क्रमांक व एस. एम. एस. सुविधा :-** ९७६९०१२०१२
**दूरध्वनी क्रमांक :-** ०२२- ७४५८०४०/४१/४२

नागरीकांनी आपल्या क्षेत्रात/परिसरात कोणत्याही प्रकारचे अनधिकृत होर्डिंग्ज लावलेले आढळल्यास अथवा नव्याने लावले जात असल्याचे निदर्शनास आल्यास वरील क्रमांकावर तक्रार नोंदविता येईल.

अधिक माहितीसाठी संबंधित प्रभागाचे नोडल अधिकारी तथा प्रभाग क्षेत्र अधिकारी यांचे दूरध्वनी क्रमांक खालीलप्रमाणे

| अ. क्र. | प्रभाग अधिकाऱ्यांचे नाव | प्रभाग समिती | भ्रमणध्वनी क्रमांक | प्रभाग क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १. | श्रीम. स्मिता काळे, | खारघर अ-१ नावडे अ-२ | ९३०९८७४०७७ | आडिवली, बीड, रोहिंजण, धानसर, तुर्भे, पिसावें, करवले बु.,तळोजे मजकुर, पेंधर, घोट, कोयनावेळे, नावडे,पडघे, तोंडरे, पालेखुर्द, देवीचा पाडा, चाळ, नागझरी, ओवे, तळोजे पाचनंद, खारघर,बेलपाडा गाव, हिरानंदनी, रेल्वे विहार, फणसवाडी,चाफेवाडी, हैदरवाडी, बेलपाडा, कातकरवाडी,कोपरा गाव, |
| २. | श्री. श्रीराम पवार | कळंबोली | ७८२०८८५९७१ | रोडपाली, कळंबोली, खिडकपाडा, वळवली, टेंभोडे आसुडगाव, नवीन पनवेल, सेक्टर १,४,५,७ मधील काही भाग, सेक्टर- ८,९,१०,११,१२ मधील काही भाग, खांदा कॉलनी, काही भाग |
| ३. | श्री.सुबोध ठाणेकर | कामोठे | ८४५०९९२१२९ | कामोठे, कामोठे गाव, जुई गाव, कोळीवाडा, गाडी नदी परिसर, धाकटा खांदा, मोठा खांदा, पनवेल, मधील काही भाग, ठाणा नाका रोड, ५२ बंगला, साई नगर, बंदर रोड |
| ४. | श्रीम. रुपाली माने | पनवेल | ८१०८२३८३०३ | काळुंद्रे, तक्का, पनवेल, नवीन पनवेल काही भाग, पोदी से- १२,१३, १४, १५, १६, १७, १८, १९ |

संबंधित प्रभागक्षेत्र अधिकारी यांनी २४ तासांत तक्रारींवर कारवाई न केल्यास त्यांची तक्रार खालील नियंत्रक अधिकाऱ्यांच्या भ्रमणध्वनी क्रमांकावर करण्यात यावी.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पदनाम | भ्रमणध्वनी |
|---|---|---|---|
| १. | श्री. रविकिरण घोडके | उपायुक्त (अतिक्रमण निष्कसन विभाग) | ९१३७०८४००८ |
| २. | श्री. सुबोध ठाणेकर | सहा. आयुक्त (अतिक्रमण निष्कसन विभाग) | ८४५०९९२१२९ |
| ३. | श्री. सदाशिव कवठे | अधिक्षक (अतिक्रमण निष्कसन विभाग) | ९८१९६३३१७४ |

तसेच नागरीकांना याद्वारे आवाहन करणेत येत आहे की, सोबत प्रसिद्ध करणेत आलेल्या प्रभागनियाह तात्पुरत्या स्वरुपामध्ये जाहिरात बॅनर लावणेकामी जागा निश्चित करणेत आलेल्या आहेत. तसेच सदर जागांची यादी यासोबत व महापालिकेच्या अधिकृत **www.panvelcorporation.com** या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत आलेली आहे. सदर ठिकाणी महापालिकेने तात्पुरते बॅनर, फ्लेक्स करीता परवानगी दिली जाणार आहे. यादीनुसार निश्चित करणेत आलेल्या जागांव्यतिरीक्त अन्य सार्वजनकि खाजगी ठिकाणी जाहिरात बॅनर, फ्लेक्स लावणेत येऊ नये, अन्यथा नियमानुसार दंडात्मक कारवाई करणेत येईल.

जा.क्र.पमपा/अ.बां.नि./३६२४/प्र.क्र.०३/९३१/२०२५
दि. ३१/१२/२०२५

सही/-
**(मंगेश चितळे)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

## पनवेल महानगरपालिका
## जाहिरात व आकाशचिन्ह विभाग
**जाहिरात बॅनर, फ्लेक्स लावणेकरीता प्रभाग निहाय निश्चित करणेत आलेल्या जागांची यादी**

| अ.क्र. | बॅनर, फ्लेक्स लावणेचे ठिकाण प्रभाग समिती 'अ', खारघर | संख्या | वार्ड क्र. |
|---|---|---|---|
| १. | रोहिंजन गाव नाका | ०१ | ०१ |
| २. | टोलनाका, धरणा गाव | ०१ | ०१ |
| ३. | खुटारी गाव, सर्विस सेंटर जवळ, खुटारी | ०१ | ०१ |
| ४. | कोयनावेळे गाव कमानी | ०१ | ०१ |
| ५. | कोयानावेळे गाव रिक्षा स्टँड | ०१ | ०१ |
| ६. | घोटगाव ब्रिज जवळ | ०१ | ०१ |
| ७ | पेंधर गाव कमानी (MIDC) | ०१ | ०१ |
| ८. | घोटगाव कमान (MIDC) | ०१ | ०१ |
| ९. | नितलस फाटा (MIDC) | ०१ | ०१ |
| १०. | नावडे गाव कमानी | ०१ | ०२ |
| ११. | भावेश वेअरहौसींग जवळ, नावडे कॉलनी, फेज- २ | ०१ | ०२ |
| १२. | नावडे तळोजा ब्रिज, पी. जे. म्हात्रे स्कुल जवळ | ०१ | ०२ |
| १३. | नावडे (MIDC) बँक ऑफ इंडिया समोर | ०१ | ०२ |
| १४. | बेलनाका (MIDC) पोलीस चौकी समोर | ०१ | ०२ |
| १५. | देविचा पाडा स्मशानभुमी समोर, कमानी जवळ | ०१ | ०२ |
| १६. | अरिहंत अमिशा सोसायटी रोड, तलावाजवळ,पालेखुर्द | ०१ | ०२ |
| १७. | तोंडरे गाव टेम्पो नाका जवळ | ०१ | ०२ |
| १८. | तोंडरे गाव पाण्याची टाकी गेटजवळ | ०१ | ०२ |
| १९. | डोंगऱ्याचापाडा गाव कमानीजवळ | ०१ | ०२ |
| २०. | पेठाली गाव, कमानी जवळ | ०१ | ०३ |
| २१. | तळोजे मजकुर गाव कमानी जवळ | ०१ | ०१ |
| २२. | तळोजे फेज- १ पोलीस चौकी जवळ | ०१ | ०३ |
| २३. | तळोजे फेज- १ अंडरपास प्रवेशद्वाराजवळ | ०१ | ०३ |
| २४. | पापडीचा पाडा गाव नाका | ०१ | ०३ |
| २५. | तळोजा फेज-१, RAF कॅम्प गेट समोर | ०१ | ०३ |
| २६. | पापडीचा पाडा, साई मन्नत सर्कल | ०१ | ०३ |
| २७. | ओवेगाव नाका | ०१ | ०३ |
| २८. | ओवेकॅम्प नाका | ०१ | ०३ |
| २९. | खुटुक बांधन गाव नाका कमानीजवळ | ०१ | ०३ |
| ३०. | सेक्टर- ३५, बँक ऑफ इंडिया समोरील ब्रिजखाली, खारघर | ०१ | ०३ |
| ३१. | पेठ गाव, मेट्रो स्टेशन समोर डाव्या बाजुस, खारघर | ०१ | ०३ |
| ३२. | रांजणपाडा गाव नाका | ०१ | ०३ |
| ३३. | खारघर गाव प्रवेश मार्ग तलावा जवळ | ०१ | ०४ |
| ३४. | डेलीबाजार समोर, खारघर | ०१ | ०४ |
| ३५. | पेठ गाव मेट्रो स्टेशनच्या उजव्या बाजुला, शिल्प चौक, खारघर | ०१ | ०४ |
| ३६. | ग्राम विकास भवन समोर, खारघर | ०१ | ०४ |
| ३७. | सेंट्रल पार्क रोडच्या डाव्या बाजुस, खारघर | ०१ | ०४ |
| ३८. | निळकंठ शॉप समोर, सेक्टर- १०, खारघर | ०१ | ०४ |
| ३९. | रामशेठ स्कुल रोडच्या डाव्या बाजुस, सेक्टर- १९, खारघर | ०१ | ०४ |
| ४०. | मुर्बी गाव, चिंचेचे झाडाजवळ खारघर | ०१ | ०४ |
| ४१. | सेक्टर- ११, भाजी मार्केट समोर, खारघर | ०१ | ०५ |
| ४२. | गणेश मंदीर, सेक्टर- १०, समोर, कोपरा, खारघर | ०१ | ०५ |
| ४३. | सिडको गार्डन समोर, सेक्टर- १०, कोपरा | ०१ | ०५ |
| ४४. | नवरंग रोड, सेक्टर- १२, झामा स्विट समोर | ०१ | ०५ |
| ४५. | बेलपाडा टॅक्सी स्टँड समोर, डाव्या बाजुस | ०१ | ०५ |
| ४६. | बेलपाडा टॅक्सी स्टँड समोर, उजव्या बाजुस | ०१ | ०५ |
| ४७. | सेक्टर- १२, गणपती मंदीर समोर, खारघर | ०१ | ०५ |
| ४८. | बेलपाडा रोड, सेक्टर- ४, YMT Dental कॉलेजजवळ | ०१ | ०५ |
| ४९. | सेक्टर- ०३, येरला मेडिकल जवळ | ०१ | ०५ |
| ५०. | सेक्टर- १२ साईबाबा मंदिर समोर, खारघर | ०१ | ०५ |
| ५१. | शाह आर्केड बिल्डिंग समोर, सेक्टर- ०६, खारघर | ०१ | ०५ |
| ५२. | सेक्टर- ०६, ड्रायविंग रेंज रोड जवळ | ०१ | ०५ |
| ५३. | मंकी पॉईंट, डाव्या बाजुस खारघर | ०१ | ०६ |
| ५४. | मंकी पॉईंट, उजव्या बाजुस खारघर | ०१ | ०६ |
| ५५. | APJ अब्दुल कलाम रोड कॉर्नर, सेक्टर- १२, खारघर | ०१ | ०६ |
| ५६. | सेक्टर- १०, बँक ऑफ इंडिया समोर, खारघर | ०१ | ०६ |
| ५७. | हायवे ब्रेक हॉटेलच्या उजव्या बाजुस, सेक्टर १०,खारघर | ०१ | ०६ |
| ५८. | सेक्टर- १५ स्वर्गगंगा ज्वेलर्स समोर, खारघर | ०१ | ०६ |
| ५९. | पेंथर टेम्पो नाका, महानगरप गॅस समोर, पेंधर | ०१ | ०६ |
| ६१. | पेंधर गाव कमानीजवळ | ०१ | ०६ |
| ६२. | तळोजा पोलीस स्टेशन रोड, बस स्टॉप समोर, तळोजा | ०१ | ०६ |
| ६३. | हॉटेल हायवे ब्रेक जवळ समोरच्या बाजुस, खारघर | ०१ | ०६ |
| ६४. | घरकुल स्पॅगेटी गेट समोर, खारघर | ०१ | ०६ |
| ६५. | विबग्योर स्कुल रोड कॉर्नर, सेक्टर- १५, खारघर | ०१ | ०५ |
| | **प्रभाग समिती 'ब', कळंबोली** | | |
| १. | कळंबोली मुख्य प्रवेश, शिवसेना शाखा ऑफिसच्या बाजूला, कंळबोली | ०१ | १० |
| २. | सुधागड हायस्कुल समोर, डाव्या बाजुस, सेक्टर ०१ ई, कळंबोली | ०१ | १० |
| ३. | सुधागड हायस्कुल समोर, उजव्या बाजुस, सेक्टर ०१ ई, कळंबोली | ०१ | १० |
| ४. | भारत गॅस समोर, गार्डन सेक्टर- १. कळंबोली | ०१ | १० |
| ५. | लेबर नाका, पोलीस निवारा गार्डन जवळ, कळंबोली | ०१ | ०९ |
| ६. | लेबर नाका, गार्डन जवळ, कळंबोली | ०१ | ०९ |
| ७. | जनता मार्केट जवळ, सेक्टर- ५. कळंबोली | ०१ | ०८ |
| ८. | समाज मंदीर जवळ, सेक्टर- ५, कळंबोली | ०१ | ०८ |
| ९. | हिंदुस्थान बँकेच्या जवळ, सेक्टर- १० ए, कळंबोली | ०१ | ०८ |
| १०. | आय.डी.बी.आय बँकेजवळ, सेक्टर- ०५ ई, कळंबोली | ०१ | ०८ |
| ११. | सिडको मार्केट जवळ, सेक्टर- ०५ ई, कळंबोली | ०१ | ०८ |
| १२. | सेक्टर- ९ ई, रिक्षा स्टँड जवळ, कळंबोली | ०१ | ०८ |
| १३. | डिमार्ट जवळ, सेक्टर- १४, कळंबोली | ०१ | ०७ |
| १४. | कळंबोली सर्कल, एमजीएम हॉस्पिटल जवळ, कळंबोली | ०१ | १० |
| १५. | पुरुषार्थ पेट्रोल पंप (तलोजा लिंक रोड) कळंबोली | ०१ | ०७ |
| १६. | स्टील मार्केट बीम कॉम्प्लेक्स जवळ, कळंबोली | ०१ | ०९ |
| १७. | खिडकपाडा गावाच्या कमानीजवळ | ०१ | ०९ |
| १८. | खिडकपाडा वाळदेश्वर मंदीर जवळ | ०१ | ०९ |
| १९. | SBI फुडलँडसमोर सिग्नलच्या दोन्ही बाजूस तलोजा, पनवेल हायवे | ०१ | ०९ |
| २०. | बँकेसमोर रोडपाली, कळंबोली | ०१ | ०७ |
| २१. | कळंबोली पोस्ट ऑफिस जवळ, कळंबोली | ०१ | ०९ |
| २२. | पनवेल मुंब्रा रोड हायवे कळंबोली बस स्टॉप जवळ | ०१ | १० |
| २३. | सेक्टर- २०, रोडपाली मैदान बाजूला | ०१ | ०७ |
| २४. | श्रीजी मिठाईवाला चौक, सेक्टर- २०, कळंबोली | ०१ | ०७ |
| २५. | के. एल.ई. कॉलेज बस स्टॉप समोर, कळंबोली | ०१ | ०८ |
| २६. | हनुमान मंदिर एल आय जी सेक्टर- २ ई, कळंबोली | ०१ | ०८ |
| २७. | सेक्टर- १२, रोडपाली म्हसोबा तलावाजवळ | ०१ | ०७ |
| २८. | आसुडगाव बस डेपो जवळ | ०१ | ०९ |
| २९. | जुना मुंबई पुणा हायवे शंकर मंदीर जवळ,खांदा कॉलनी | ०१ | १५ |
| ३० | शिवाजी चौक सर्कलच्या खांदा कॉलनी | ०१ | १५ |
| ३१. | महाराष्ट्र शाखा जवळ रोडपाली | ०१ | ०८ |
| ३२. | रोडपाली बस डेपो समोर, कळंबोली | ०१ | ०७ |
| ३३. | महात्मा स्कुल रोड, डाव्या बाजुस, सेक्टर- ८, खांदा कॉलनी | ०१ | १५ |
| ३४. | सी.के.टी कॉलेज रोड, उजव्या बाजुस, खांदा कॉलनी | ०१ | १५ |
| ३५. | हनुमान मंदिर समोर, आसुडगाव | ०१ | १५ |
| ३६. | नॅशनल बँके समोर, नवीन पनवेल | ०१ | १५ |
| ३७. | सेक्टर- ०७, पॅनेसिया हॉस्पिटल समोर, नविन पनवेल | ०१ | ०९ |
| ३८. | आदई तलावाजवळ, नवीन पनवेल | ०१ | १६ |
| ३९. | आदई सर्कल समोर, डाव्या बाजुस, नविन पनवेल | ०१ | १६ |
| ४०. | शिवा कॉम्प्लेक्स, रस्त्याचे डाव्या बाजुस, नवीन पनवेल | ०१ | १६ |
| ४१. | एच.डी.एफ.सी. सर्कल समोर उजव्या बाजुस, नवीन पनवेल | ०१ | १६ |
| ४२. | डी मार्ट दोन्ही बाजुस, नवीन पनवेल | ०१ | १६ |
| ४३. | नेवाळी ब्रिज जवळ, नवीन पनवेल | ०१ | ०९ |
| ४४. | डॉ. वाजेकर यांचे दवाखान्याचे बाजुस, सेक्टर- ४, नवीन पनवेल | ०१ | १६ |
| ४५. | शबरी हॉटेल समोर, सेक्टर- ०१, नवीन पनवेल | ०१ | १६ |
| ४६. | सेक्टर- ०१, अपना सहकारी बँक जवळ, मनसे गार्डन ०१ नवीन पनवेल | ०१ | १६ |
| ४७. | नवीन पनवेल पेट्रोल पंपासमोर, सेक्टर- ११ | ०१ | १६ |
| ४८. | महादेव पाटील यांचे सर्विस सेंटर जवळ चौक,कळंबोली | ०१ | ०७ |
| ४९. | सिडको अग्निशमन केंद्राजवळ, कळंबोली | ०१ | १० |
| ५०. | देशी तडका हॉटेल जवळ, आसुडगाव | ०१ | ०९ |
| ५१. | इंटरनेटबार समोर, आसुडगाव | ०१ | ०९ |
| ५२. | देवांशी इन हॉटेल समोर, स्टील मार्केट, उजव्या बाजुस, कळंबोली | ०१ | ०९ |
| ५३. | मॅकडोनाल्डच्या डाव्या बाजुस, कळंब | ०१ | १० |
| ५४ | डी. ए. व्हि. स्कुल समोर, उजव्या बाजुस, नवीन पनवेल | ०१ | १६ |
| | **प्रभाग समिती 'क' कामोठे :-** | | |
| १ | कामोठे प्रवेश अरीवली स्वीट से. ०६ ए, रिक्षा स्टँड जवळ | ०१ | ११ |
| २ | शिवसेना शाखेजवळ से. ३६, कामोठे. | ०१ | ११ |
| ३ | एज जी शोरूम खांदा कॉलनी, से. ०७ | ०१ | ११ |
| ४ | कामोठे पोलीस स्टेशन जवळ, से. ११, कामोठे. | ०१ | ११ |
| ५ | ऐश्वर्या हॉटेल समोर से. ०९ कामोठे | ०१ | ११ |
| ६ | मनमोहन स्वीट समोर, से. ३४, कामोठे. | ०१ | ११ |
| ७ | मालवन हॉटले जवळ, से. ३४, कामोठे | ०१ | ११ |
| ८ | से. १७ समोरील मैदान समोर, मानसरोवर स्टेशन रोड, डाव्या बाजुस, कामोठे | ०१ | ११ |
| ९ | से. २१ सिडको कार्यालय, सिडको कम्यूनीटी सेंटर जवळ कामोठे. | ०१ | ११ |
| १० | से. ०९ सिडको ऑफिसच्या बाजूला सिडको कम्यूनीटी सेंटर कामोठे | ०१ | १२ |
| ११ | से. २१, भाजी मार्केट, कामोठे. | ०१ | १२ |
| १२ | से. २२ सिडको मार्केट जवळ, कामोठे | ०१ | १२ |
| १३ | से. २५ अक्षर सोसायटी जवळ, कामोठे | ०१ | १३ |
| १४ | से. २० सिडको गार्डन जवळ (कामोठे स्मशानभुमी जवळ) | ०१ | १३ |
| १५ | से. ०५ दत्तूशेठ पाटील कॉलेज जवळ. कामोठे | ०१ | १३ |
| १६ | सेक्टर-१७ समोरील मैदान, मानसरोवर स्टेशन रोड, उजव्या बाजुस, कामोठे | ०१ | १३ |
| | **प्रभाग समिती ''ड' पनवेल** | | |
| १. | काळुंद्रे पेट्रोलपंप डाव्या बाजुस, पनवेल | ०१ | १९ |
| २. | काळुंद्रे पेट्रोलपंप उजव्या बाजुस, पनवेल | ०१ | १९ |
| ३. | काळुंद्रे गाव प्रवेशमार्ग, डाव्या बाजुस, पनवेल | ०१ | १९ |
| ४. | काळुंद्रे गाव प्रवेश मार्ग, उजव्या बाजुस, पनवेल | ०१ | १९ |
| ५. | पंचरत्न हॉटेल समोर, पनवेल | ०१ | १९ |
| ६. | पिल्ले हॉस्टेल, समोर, उजव्या बाजुला, नवीन पनवेल | ०१ | १९ |
| ७. | पिल्ले हॉस्टेल, समोर, डाव्या बाजुला, नवीन पनवेल | ०१ | १९ |

# संकल्प रायगडच्या विकासाचा



## राज्य उत्पादन शुल्क विभागाचा दणका

● बेकायदेशीररित्या दारु विक्री, निर्मिती व वाहतूक करणाऱ्यांवर अंकूश ठेवण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क रायगड विभागाने डिसेंबर अखेरपर्यंत धडक कारवाई केली. या कारवाईत ५८ लाख ५५ हजार ६१९ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून १७४ आरोपींना अटक करण्यात यश आले आहे. अवैधरित्या दारु विक्री, वाहतूक करणाऱ्यांना या कारवाईने राज्य उत्पादन शुल्क विभागाचा दणका मिळाला आहे. रायगड जिल्ह्यातील गावठी दारुसह बेकायदेशीररित्या अन्य देशी, विदेशी दारुची विक्री वाहतूक व निर्मिती करणाऱ्यांवर अंकुश ठेवण्यासाठी पथक तैनात करण्यात आले आहे. डिसेंबर महिन्यात नाताळ, थर्टी फर्स्टला दारु विक्री मोठ्या प्रमाणात होते. काहीजण वेगवेगळ्या राज्यातून बेकायदेशीर दारू आणून ती विकण्याचा प्रकार करतात. तर काही जण बनावट दारु तयार करून बाजारात विकण्याचा धाडस करीत असतात. राज्य उत्पादन शुल्क रायगड विभागाचे अधीक्षक रविकिरण कोले यांनी हा प्रकार रोखण्यासाठी डिसेंबर २०२४पासूनच कारवाई करण्याची मोहिम हाती घेतली.

## काशीदमधील रो–रो जेट्टीचे काम होणार पुर्ण

● रायगड जिल्हा पर्यटनाच्या दृष्टीने कायमच नावारुपाला आला आहे. काशिद याठिकाणी लाखो पर्यटक आवर्जून भेट देतात. सुंदर असा समुद्रकिनारा, वेगवेगळ्या प्रकारची सुरूची झाडे, घरगुती पध्दतीने मिळणारे कॉटेजमधील भोजनाचा आनंद पर्यटक मनमुरादपणे घेतात. मुंबई, पुणे, नाशिक, कोल्हापूर, ठाणे, सोलापूर, नागपूर, अशा अनेक जिल्ह्यातील पर्यटक काशीद समुद्रकिनारी फिरण्यास येतात. काशीद व मुरूड तालुक्यातील अनेक तरुण नोकरी व्यवसायानिमित्त मुंबई, ठाणेमध्ये जातात. त्यांना त्यांच्या गावी येताना गेटवे ते मांडवा, मांडवा ते अलिबाग त्यानंतर एसटी बस अथवा खासगी वाहनांचा आधार घेत काशीद व मुरूडमध्ये यावे लागते. परंतु, आता पर्यटकांसह स्थानिकांचा हा प्रश्न लवकरच मार्गी लागणार आहे. काशीद समुद्रकिनाऱ्यापासून काही अंतरावरच रो–रो जेट्टीचे काम सुरु आहे. सागरमाला योजनेअंतर्गत काशीद समुद्रकिनाऱ्यापासून काही अंतरावर टर्मिनल इमारत, ब्रेक वॉटर, तरंगती जेटी उभारली जाणार आहे. ब्रेक वॉटर व टॉप काँक्रीटसाठी १११ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता मिळाली असून ९० कोटी रुपये आतापर्यंत खर्च झाले आहेत. तरंगत्या जेटीसाठी ५६ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती.

## मच्छी व्यवसाय संकुल होणार खुले

● रायगड जिल्ह्यात कोळी समाज मोठ्या प्रमाणात आहे. त्यामध्ये अलिबाग, मुरूड, रोहा, पेण, पनवेल, श्रीवर्धन, म्हसळा या तालुक्यांमध्ये कोळी समाजाची संख्या प्रचंड आहे. मासेमारी करून हा समाज त्यांच्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करीत आहेत. जिल्ह्यात सुमारे तीन हजारहून अधिक मासेमारी बोटी आहेत. त्यामध्ये यांत्रिकी सुमारे दोन हजार बोटींचा समावेश आहे. अलिबाग हे शहर पर्यटन व ऐतिहासिक दृष्ट्या महत्वाचे ठरत आहे. या ठिकाणी पर्यटक मोठ्या प्रमाणात येतात. पर्यटन वाढीला चालना देण्याबरोबरच मच्छीमारांच्या आर्थिक विकासाला गती देण्यासाठी अलिबाग शहरामध्ये गेल्या अनेक वर्षापासून मच्छी व्यवसाय संकुल उभारणीचे काम सुरु होते. हे काम अंतिम टप्प्यात आहे. एक ते दोन महिन्यात ही कामे पुर्ण होणार आहेत. त्यामध्ये रंगकाम, बाहेरच्या परिसरात पेव्हर ब्लॉक लावण्याची कामे प्रगतीपथावर सुरु असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाने दिली आहेत. मच्छीमारांना आधुनिक पद्धतीने मासेमारी करण्याचे धडे मिळावेत, त्यांच्या राहणीमानात बदल व्हावा, आर्थिक व सामाजिक विकास साधण्यासाठी अलिबाग कोळीवाड्यालगतच राष्ट्रीय कृषी योजनेंतर्गत मच्छी व्यवसाय संकुल बांधण्यात आले आहे. या संकुलामध्ये मत्स्य व्यवसाय सहाय्यक आयुक्तांचे कार्यालय, मच्छी व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, अद्ययावत असे मत्स्यालय, ग्रंथालय, वाचनालय तसेच सभागृह असणार आहे. प्रशिक्षणार्थींसाठी वसतीगृहदेखील या संकुलात असणार आहे. ८५६ चौरस मीटर क्षेत्रात हे संकुल बांधण्यात आले आहे. या संकुलाचे ९५ टक्के काम पुर्ण झाले आहे. पाच टक्के काम पुर्ण झाले आहे. त्यामुळे गेल्या अनेक वर्षापासून असलेली संकुलाची प्रतिक्षा आता थांबणार आहे. अलिबागसह जिल्ह्यातील कोळी समाजासह मच्छीमारांना हक्काचे संकुल मिळणार आहे. मच्छीमारांच्या सर्वांगिण विकासासाठी हे संकूल दिशा दर्शक केंद्र ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे. २०२५ मध्ये हे संकुल खुले होणार आहे.



## अलिबाग–रोहा रस्त्याचे काम पुर्ण होण्याची अपेक्षा

● अलिबाग रोहा व माणगाव या तीन तालुक्यांना जोडणारा ८४ किलो मीटरचा रस्ता गेल्या तीन वर्षापासून प्रलंबित आहे. रस्त्यावरील खड्डे, खडीमुळे प्रवाशांना प्रचंड त्रास होत आहे. हा प्रश्न कायमचा मार्गी लावण्यासाठी अलिबागपासून रोहा साईपर्यंतच्या रस्त्यासाठी १५७ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या रस्त्याचे ५० टक्के काम पुर्ण झाल्याचा दावा बांधकाम विभागाकडून करण्यात आला आहे. बांधा वापरा आणि हस्तांतरण करा या धर्तीवर रस्त्याचे काम करण्यात आले आहे. रुंदीकरण, डांबरीकरण व मजबूतीकरण या नुसार रस्त्याचे काम केले जाणार आहे. काँक्रीटीकरणासह रुंदीकरणाचे काम अपुर्णच आहे. २०२४ पर्यंत या रस्त्याचे काम पुर्ण होण्याची अपेक्षा होती. परंतु, प्रवाशांसह नागरिकांची घोर निराशा झाली. सुरुवातीला नेमण्यात आलेल्या ठेकेदाराकडून काम संथगतीने करण्यात आले. त्यानंतर दुसरा ठेकेदार नेमण्यात आला. त्यांच्याकडूनही कामाची गती फारसी दिसली नाही. अलिबाग वावे मार्गावरील खानाव ते गेल कंपनीपर्यंतचा काँक्रीटरस्ता अपुर्ण अवस्थेत राहिल्याने गतवर्षी पावसाळ्यात खड्ड्यातून प्रवास करण्याची वेळ प्रवाशांवर आली. मात्र, नव्या वर्षात हे काम शंभर टक्के पुर्ण करण्याचा संकल्प सार्वजनिक बांधकाम विभागाने केला आहे. त्याची तयारी ही गेल्या काही दिवसांपासून सुरु केली आहे. त्यामुळे २०२५ या नव्या वर्षात रस्त्याचे काम पुर्ण होण्यची अपेक्षा व्यक्त केल जात आहे.





## नवीन जिल्हा रुग्णालयाचे काम होणार सुरु

● अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालयाची इमारत जूनी झाली आहे. हे रुग्णालय सुमारे दोनशे खाटांचे आहे. या ठिकाणी डायलेसीस, सोनोग्राफी, एक्सरे सेंटर असून वेगवेगळ्या आजारावरील तज्ञदेखील उपलब्ध आहेत. वाढत्या नागरिकीकरणामुळे रुग्णांची संख्यादेखील येण्याचे प्रमाण वाढले आहे. पोलादपूरपासून श्रीवर्धन, माणगावमधील रुग्णदेखील अलिबागमध्ये उपचारासाठी येतात. रुग्णांना चांगली सेवा मिळावी यासाठी जून्या इमारतीच्या जागी नवीन इमारत बांधली जाणार आहे. नवीन रुग्णालय लवकरच बांधले जाणार आहे. नवीन रुग्णालयासाठी १०५ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तीनशे खाटांचे हे रुग्णालय असणार आहे. रुग्णांना चांगल्या सुविधा देण्यासाठी विशेष तज्ञ, कर्मचारी, डायलेसी सेंटर व इतर सुविधा उपलब्ध असणार आहेत. या नव्या रुग्णालयासाठी मंजूरी प्राप्त झाली आहे. नवीन २०२५ या वर्षात नव्या रुग्णालयाचे काम सुरू होण्याची अपेक्षा आहे.

### “ चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध करणार

रायगड जिल्ह्यातील महाडमधील दोन, अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालय, उरणमधील रुग्णालयातील प्रत्येकी एक असे चार रुग्णालयांचे नवीन बांधकाम करण्याचा मानस आहे. पाली– सुधागडमध्ये सध्या नवीन रुग्णालयाचे बांधकाम सुरु आहे. नव्या वर्षात हे बांधकाम पुर्ण करून सार्वजनिक बांधकाम विभागाकडून हस्तांतरीत करण्याचा प्रयत्न राहणार आहे. कर्जत, रोहामध्ये डायलेसीस सेंटर सुरु केले जाणार आहे. तसेच, माणगाव व पनवेलमध्ये अस्थिरोगांवर विनामुल्य शस्त्रक्रीया करण्याचा मानस आहे. जिल्ह्यात उपचारासाठी येणाऱ्या सर्व घटकाला चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध केल्या जाणार आहेत. ”

**– डॉ. अंबादास देवमाने**
**जिल्हा शल्यचिकित्सक**

## शाळांवर राहणार सीसीटीव्हीची नजर

● रायगड जिल्ह्यामध्ये अडीच हजारहून अधिक जिल्हा परिषदेच्या शाळा आहेत. या शाळांपैकी फक्त ४९ शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आली आहेत. शाळांबरोबरच तेथील विद्यार्थी, विद्यार्थीनी तसेच कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी जिल्हा परिषद शिक्षण विभागाने शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याच्या हालचाली सुरु केल्या आहेत. डिसेंबर२०२४ पर्यंत हे काम पुर्ण होण्याची अपेक्षा होती. परंतु, निधी अभावी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे काम लांबणीवर गेले आहे. रायगड जिल्हयातील दोन हजार ४७९ शाळा सीसी कॅमेराविनाच आहेत. या शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी जिल्हा परिषद शिक्षण विभागाने जिल्हा नियोजन समितीकडे मागणी केली आहे. परंतु, जिल्हा नियोजन समितीची बैठक न झाल्याने निधी मंजूर करण्याबरोबरच वितरण करण्याचे काम रखडले आहे.

## दोन हजार किमीचे रस्ते होणार चकाचक

● रायगड जिल्हा परिषदेच्या अखत्यारित १ हजार ९०० वाड्यांचा समावेश असून ग्रामीण भागाची लोकसंख्या सुमारे १६ लाख इतकी आहे. गावांतील रस्त्यांची लांबी ५ हजार ५०० किलो मीटर असून जिल्ह्यातील २ हजार किलो मीटरचे रस्ते खराब झाले आहेत. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून गावांचा विकास केला जातो. गावांमध्ये रस्ते व अन्य सुविधा राबविल्या जातात. मात्र, खराब झालेल्या अडीच हजार किलो मीटरच्या रस्त्याची दुरूस्ती केली नसल्याने गावांच्या विकासावर त्याचा परिणाम होऊ लागला आहे. गावांपर्यंत जाण्यासाठी खड्डेमय रस्ते असल्याने प्रवास करताना भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. खड्डेमय रस्त्यामुळे अपघात होण्याची भीती व्कत केली जात आहे. रस्त्याच्या दुरुस्तीसाठी ग्राम विकास विभागाकडून सूमारे १४ कोटी रुपयांचा निधी जिल्हयासाठी मंजूर केला आहे. जिल्हा परिषदेकडून त्याची निविदाही काढण्यात आली होती. परंतु, लोकसभा व विधानसभा निवडणूकीच्या आचारसहितेमुळे ही कामे लांबणीवर गेली. आता नवीन सरकार स्थापन झाले आहे. मात्र, जिल्ह्याचे पालकमंत्रीपद जोपर्यंत होत नाही, तोपर्यंत जिल्हा नियोजन समितीची बैठक होणे कठीण आहे. जिल्हा नियोजन समितीकडून निधी प्राप्त झाल्यावर मार्च अखेरपर्यत दोन हजार किलो मीटरचे रस्ते चकाचक होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



## सरत्या वर्षाला निरोप देण्याचा क्रेझ गावातही

● सरत्या वर्षाला निरोप देण्याचा क्रेझ गेल्या तीन वर्षात जिल्ह्यातील ग्रामीण भागातदेखील वाढू लागला आहे. २०२४ या सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी गावागावात तयारी करण्यात आली. शेतांसह फार्महाऊसमध्ये वेगवेगळे उपक्रम राबवून हा दिवस जल्लोषात साजरा करण्यात आला. गावातील ग्रामस्थ, महिलांनी एकत्र येत गोड पदार्थ तयार करण्याबरोबरच मासांहार तयार करून त्यावर ताव मारला. २०२५ वर्ष उगविल्यावर रात्री बारानंतर ध्वनिक्षेपकच्या तालावर नाचत अनेकांनी नव्या वर्षाचे स्वागत केले. काहींनी कोकणातील वैशिष्ट्यपूर्ण खाद्य पदार्थाचा प्रकार असलेल्या पोपटी खाण्याचा आनंददेखील घेतला. गेल्या पंधरा दिवसांपासून ही तयारी सुरु होती. काहींनी शेतांमध्ये एकत्र येऊन नव्या वर्षाचा आनंद उत्सव साजरा केला.

# नवे वर्ष, नवे नियम

## सर्वसामान्यांच्या थेट खिशावर होईल परिणाम

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**१ जानेवारी येताच केवळ कॅलेंडरच बदलणार नाही, तर हे नवीन वर्ष स्वत:सोबत असे अनेक नियम घेऊन येणार आहे, ज्याचा थेट परिणाम सर्वसामान्यांच्या खिशावर होणार आहे.**

### सेन्सेक्सची मासिक एक्स्पायरी बदलली

● १ जानेवारी २०२५ पासून सेन्सेक्स आणि ५०ची मंथली एक्स्पायरी प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या मंगळवारी होईल. सेन्सेक्सचे साप्ताहिक करारही शुक्रवारऐवजी मंगळवारी संपतील. सध्या, सेन्सेक्सची मासिक मुदत प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या शुक्रवारी असते, तर बँकेक्सचे मासिक करार दर महिन्याच्या शेवटच्या सोमवारी संपतात आणि सेन्सेक्स ५०चे करार दर महिन्याच्या शेवटच्या गुरुवारी संपतात.

### नवीन कार महाग

● ऑटोमाबाईल कंपन्यांनी डिसेंबरमध्ये कारच्या खरेदीवर बंपर सवलत दिली होती. मात्र, १ जानेवारीपासून बहुतेक कंपन्यांकडून कारच्या विक्रीत लक्षणीय वाढ करण्यात येणार आहे. याचा थेट परिणाम तुमच्या खिशावर होणार आहे. १ जानेवारी २०२५ पासून ह्युंदाई, महिंद्रा, टाटा, मारुती सुझुकी, मर्सिडीज–बेन्झ, होंडा आणि ऑडीसारख्या कंपन्या वाहनांच्या किमती ३ टक्क्यांनी वाढविणार आहेत.

### ईपीएफओच्या नियमांत बदल

● नव्या नियमानुसार आता पेन्शनधारक देशातील कोणत्याही बँकेतून पेन्शन काढू शकणार आहेत. यासाठी त्यांना कोणत्याही अतिरिक्त पडताळणीची गरज भासणार नाही.

### युपीआयमध्ये बदल

● नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एनीपीसीआय)ने नवीन वर्षात १२३ ची लिमिट देखील वाढवली आहे. आत्तापर्यंत, या पेमेंट सेवेद्वारे कमाल ५,००० रुपयांपर्यंतचे व्यवहार केले जाऊ शकतात. नवीन वर्षात त्याची लिमिट १०,००० रुपये करण्यात आली आहे.

### एलपीजी महागणार

● दर महिन्याच्या पहिल्या दिवशी तेल आणि वायू कंपन्यांकडून एलपीजीच्या किमतीचे दर बदलण्यात येतात. गेल्या काही महिन्यांमध्ये व्यावसायिक सिलिंडरचे दर वाढविण्यात आले आहेत. तर, घरगुती वापराच्या गॅस सिलिंडरचे स्थिर ठेवण्यात आले आहेत. १ जानेवारीपासून गॅस सिलिंडरचे दर बदलणार आहेत.

### हमीशिवाय २ लाखांपर्यंतचे कृषी कर्ज

● भारतीय रिझर्व्ह बँकेने नववर्षानिमित्त शेतकऱ्यांना मोठी भेट दिली आहे. रिझर्व्ह बँकेने शेतकऱ्यांना हमीशिवाय कर्ज देण्याची मर्यादा २ लाख रुपये केली आहे. यापूर्वी ही मर्यादा १.६० लाख रुपये होती.

### मुदत ठेव नियमांमध्ये बदल

● आरबीआयनं नॉन–बँकिंग वित्तीय कंपन्या आणि गृहनिर्माण वित्तपुरवठा कंपन्यांसाठी मुदत ठेवींशी संबंधित नियम बदलले आहेत. नवीन नियम १ जानेवारी २०२५ पासून लागू होतील. या बदलांतर्गत ठेवींची सुरक्षा सुनिश्चित करणे, ठेवी घेणे, तरल मालमत्तेचा काही भाग सुरक्षित ठेवणे आणि ठेवींचा विमा करणे यासारख्या बदलांचा समावेश आहे.

### ई–केवायसी नसलेले रेशन कार्ड रद्द होणार

● केंद्र सरकारने शिधापत्रिकाधारकांची (रेशन कार्ड) ओळख पडताळण्यासाठी ई–केवायसी अनिवार्य केले आहे. त्यासाठी नागरिकांना ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. जर शिधापत्रिकाधारकांनी या तारखेपर्यंत ई–केवायसी प्रक्रिया पूर्ण केली नाही, तर त्यांची शिधापत्रिका १ जानेवारी २०२५ पासून रद्द करण्यात येण्याची शक्यता आहे. केंद्र सरकारकडून पुन्हा मुदतवाढ होणार का? हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

### लक्झरी वस्तूंच्या खरेदीवर अधिक कर

● नवीन वर्ष २०२५ मध्ये तुम्ही लक्झरी वस्तू खरेदी केली तर त्यावर अधिक कर भरावा लागणार आहे. अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार जर सूचीबद्ध लक्झरी वस्तुची किंमत १० लाख रुपयांपेक्षा जास्त असेल, तर त्यावर (स्रोत जमा झालेला कर) भरावा लागणार आहे. १ जानेवारी २०२५ पासून नवीन आर्थिक वर्षाच्या सुरुवातीसह प्राप्तिकराशी संबंधित अनेक नियम लागू होणार आहेत.




# अमेरिकाबाबाची गुहा

अमेरिकेत जाणे हे भारतीय तरुणांचे स्वप्न असते. इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी अर्थात आयटी नावाच्या मंत्राने भारतीय तरुणांसाठी ही अमेरिकाबाबाची गुहा उघडली होती. गेल्या ३५ वर्षात लाखो तरुणांनी तिच्यातून भरपूर डॉलर आणले. आता मात्र गुहेचे हे दार बंद करण्याची वाढती मागणी होऊ लागली आहे. कारण, बाहेरून येणाऱ्यांमुळे खुद्द अमेरिकेतील तरुणांना नोकऱ्या मिळेनाशा झाल्या आहेत अशी सार्वत्रिक भावना आहे. एच-वन बी व्हिसावरून सध्या अमेरिकेमध्ये हे जे वादळ उठले आहे ते भारतासाठी महत्वाचे आणि रोचक आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानासंदर्भात आपले सल्लागार म्हणून श्रीराम कृष्णन यांची नियुक्ती केली तेव्हापासूनच या वादाला सुरुवात झाली. कृष्णन हे चेन्नईत जन्मलेले अवघे चाळीस वर्षांचे तरुण आहेत. एलॉन मस्कने ट्विटर विकत घेतल्यावर ती कंपनी नव्याने उभारण्यासाठी कृष्णन हे मदत करीत होते. शिवाय त्यांना राजकारणातही बराच रस असून ब्रिटनचे वादग्रस्त माजी पंतप्रधान बोरीस जॉन्सन आणि मस्क यांना एकत्र आणण्याचा प्रयत्न त्यांनी केला होता. मुळात २२ डिसेंबरला कृष्णन यांची निवड झाली तेव्हापासूनच अमेरिकी लोकांनी त्यांच्यावर आक्षेप घ्यायला सुरुवात केली. ट्रम्प सल्लागार म्हणून निवडायला यांना एखादा अमेरिकी भेटला नाही का असे म्हणायचेच काय ते टीकाकारांनी बाकी ठेवले होते. त्यातच कृष्णन यांची एक पोस्ट उघड झाली. त्यात त्यांनी एच-वन बी व्हिसांवरचे निर्बंध हटवून अधिकाधिक उच्चशिक्षित मुलांना अमेरिकेत येण्यासाठी प्रवेश दिला पाहिजे असे मत व्यक्त केले होते. यामुळे ट्रम्प यांच्या समर्थकांचा भडका उडाला. मेक अमेरिका ग्रेट अगेन(मागा) म्हणजेच अमेरिकेला पुन्हा महान करूया अशी घोषणा देऊन ट्रम्प यांनी यंदाची अध्यक्षीय निवडणूक लढवली होती. अमेरिकेत बाहेरच्या लोकांना प्रवेश नको असे वाटणारे लक्षावधी कट्टर अमेरिकी लोक आता तयार होऊ लागले आहेत. त्या सर्वांनी ट्रम्प यांची ही मोहिम उचलून धरली होती.

## ट्रम्प यांचाही पाठिंबा

त्या पार्श्वभूमीवर कृष्णन यांची ही नियुक्ती व त्यांचे मत यामुळे एकदम भडका उडाला. त्यातच मस्क यांनी कृष्णन यांचे समर्थन केले. मस्क हे स्वतः दक्षिण आफ्रिकेतून एच-वन बी व्हिसाच्या आधारे अमेरिकेत आलेले उद्योगपती आहेत. जगातले सर्वात श्रीमंत इसम अशी त्यांची सध्याची ओळख आहे. हा इसम अतिशय लबाड, संधिसाधू, गर्विष्ठ आहे. टेस्ला नावाची मोटार कार तयार करण्यापासून आकाशात उपग्रह सोडण्यापर्यंत अनेक उद्योग ते करतात. मात्र अमेरिकी सरकारच्या विविध निधींचा अचूक फायदा उठवत त्यांनी हे साम्राज्य उभारलेले आहे. मध्यंतरी त्यांनी ट्विटर विकत घेतले. आता त्याला एक्स असे म्हणतात. या माध्यमाची सर्व ताकद यंदा त्यांनी ट्रम्प यांच्यामागे उभी केली. शिवाय ट्रम्प यांच्या मोहिमेसाठी शेकडो कोटी डॉलर्स दिले. यामुळेच जिंकून आल्यावर ट्रम्प यांनी मस्क यांना आपले सल्लागार म्हणून नेमले. ट्रम्प आणि मंडळी वीस जानेवारीला प्रत्यक्ष सूत्रे हाती घेतील. पण त्यांनी आपली धोरणे जाहीर करायला त्यापूर्वीच सुरूवात केली आहे. एच वन बी व्हिसाचा वाद त्यातूनच निर्माण झाला आहे. या व्हिसाद्वारे अधिकात अधिक लोकांना अमेरिकेत प्रवेश द्यावा असे ट्रम्प यांच्या सल्लागारांचे म्हणणे आहे. ट्रम्प यांच्या सामान्य समर्थकांना मात्र ते मान्य नाही. गंमत अशी आहे की, पहिल्यांदा अध्यक्ष असताना म्हणजे २०१६ ते २० या दरम्यान खुद्द ट्रम्प यांनी याच व्हिसाला कडाडून विरोध केला होता. हे व्हिसा देणे रोखून धरले होते. आता बहुदा मस्कच्या पैशांना स्मरून त्यांनी बाजू बदलली आहे. मी माझ्या कंपनीतही या व्हिसाद्वारे बऱ्याच लोकांना काम दिलेले आहे व ही चांगली योजना आहे असे ट्रम्प यांनी म्हटले आहे. अर्थात, प्रत्यक्ष अध्यक्षपदाची सूत्रे घेतल्यावर ट्रम्प काय करतील हे कोणीच सांगू शकत नाही. कारण ते अत्यंत बेभरवशी नेते आहेत.

## उलटा प्रवाह

एच-वन बी व्हिसा ही योजना १९९० मध्ये सुरु झाली. अमेरिकी आयटी किंवा इतर कंपन्यांना तेव्हा उच्चशिक्षित इंजिनिअर्सची चणचण जाणवत होती. त्यासाठी ही योजना काढण्यात आली. त्यानुसार, भारत, चीन इत्यादी देशांमधील इंजिनिअर्स, संशोधक वगैरेंना सहा वर्षांपर्यंत अमेरिकेत जाऊन नोकरी करण्यासाठी व्हिसा मिळू लागला. त्यानंतर त्यांना एक वर्षाचा ब्रेक दिला जाई व ते पुन्हा व्हिसासाठी अर्ज करू शकत. या योजनेचे दोन फायदे होते. अमेरिकेमध्ये अमेरिकी नागरिकाला नोकरीवर ठेवायचे झाल्यास तेथील नियमांनुसार प्रचंड पगार द्यावा लागतो. भारत इत्यादी बाहेरच्या देशांमधून येणाऱ्या इंजिनिअर्सना कमी पगार दिले तरी चालतात. ही रक्कम अमेरिकेच्या मानाने कमी असली तरी तरुणांच्या मूळ देशांतील पगाराच्या हिशेबात कित्येक पट असते. आजवरचा अनुभव असा आहे की, दरवर्षी दिल्या जाणाऱ्या दोन ते तीन लाख एच-वन बी व्हिसापैकी सत्तर टक्के व्हिसा हे भारतीय तरुण पटकावत असतात. याचे कारण म्हणजे आपल्या देशात इंजिनिअरिंग, वैद्यकीय वा अन्य तंत्रज्ञानाचे उच्च शिक्षण देणाऱ्या विपुल संस्था. अमेरिकेत हे शिक्षण प्रचंड महाग आहे. त्या मानाने भारतात ते खूपच स्वस्त आहे. शिवाय, याच भरपूर पैसे असल्याने बहुसंख्य बुध्दिमान तरुण या क्षेत्राकडे वळतात. याउलट अमेरिकेत मात्र एकूणच विज्ञान, तंत्रज्ञान, गणित इत्यादींकडे जाणाऱ्यांची संख्या कमी आहे. विप्रो, इन्फोसिस इत्यादी कंपन्यांनी आरंभी अशा उच्चशिक्षित तरुणांना तेथे नोकरीसाठी नेऊन आपला धंदा सुरु केला व नंतर त्याचा प्रचंड विस्तार झाला. या व्यवस्थेत शिरकाव करणे आता स्थानिक अमेरिकींना कठीण होऊ लागले आहे. त्याचमुळे हा ताजा वाद निर्माण झाला आहे. आजवर अमेरिकी भांडवली कंपन्या भारताला लुटतात म्हणून आपण विरोध करीत होतो. आता भारतीय तरुण आणि आयटी कंपन्या आम्हाला लुटतात असे अमेरिका म्हणत आहे.

## विचार

# पाणी 'हाय रिस्क श्रेणी'मध्ये?

**केंद्र सरकारच्या भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरणाने पॅकेज्ड ड्रिंकिंग आणि मिनरल वॉटरचा समावेश 'हाय रिस्क फूड कॅटेगरी'मध्ये करण्याबाबत घेतलेल्या निर्णयामुळे सावधगिरीची भावना निर्माण होणे साहजिकच आहे. केंद्र सरकारच्या म्हणण्यानुसार मिनरल वॉटर हे मोठ्या प्रमाणावर वापरले जाणारे उत्पादन आहे आणि आरोग्याशी संबंधित असलेल्या या उत्पादनांच्या गुणवत्तेत कोणत्याही प्रकारच्या हलगर्जीचे गंभीर परिणाम होऊ शकतात. त्यामुळे त्याचा समावेश हाय रिस्क फूड कॅटेगरीमध्ये केला गेला आहे.**

केंद्र सरकारच्या भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरणाने पॅकेज्ड ड्रिंकिंग आणि मिनरल वॉटरचा समावेश 'हाय रिस्क फूड कॅटेगरी' मध्ये करण्याबाबत घेतलेल्या निर्णयामुळे सावधगिरीची भावना निर्माण होणे साहजिकच आहे. केंद्र सरकारच्या म्हणण्यानुसार मिनरल वॉटर हे मोठ्या प्रमाणावर वापरले जाणारे उत्पादन आहे आणि आरोग्याशी संबंधित असलेल्या या उत्पादनांच्या गुणवत्तेत कोणत्याही प्रकारच्या हलगर्जीचे गंभीर परिणाम होऊ शकतात. आपल्या रोजच्या वापरात असलेल्या मिनरल वॉटर किंवा पिण्याच्या बाटलीबंद पाण्याला येत्या काळात आपल्या गुणवत्तेचे आणि शुद्धतेच्या निकषांचे कटेकोर नियंत्रण करत असल्याचे सिध्द करावे लागेल, कारण त्याचा समावेश हाय रिस्क फूड कॅटेगरीमध्ये केला गेला आहे. याचा अर्थ आता या उत्पादनांच्या गुणवत्तेवर बारकाईने लक्ष ठेवले जाईल आणि त्यांची तपासणी केली जाईल तसेच स्वतंत्र पक्षाद्वारे ऑडिट केले जाईल.

२९ नोव्हेंबर २०२४ रोजीच्या या आदेशानंतर भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने उच्च-जोखीम अन्न श्रेणी अंतर्गत पॅकेज केलेले पेय/खनिज पाणी पुनर्वर्गीकृत केल्यामुळे या श्रेणीतील केंद्रीय परवानाधारकांनी आता पॅकेज केलेल्या पाण्याच्या उत्पादनाशी संबंधित संभाव्य आरोग्य धोके कमी करण्याच्या उद्देशाने वार्षिक तपासणी अहवाल सादर करणे आवश्यक आहे. पॅकेज्ड आणि मिनरल वॉटर उद्योगासाठी ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्डकडून प्रमाणपत्र घेण्याची सक्ती केंद्र सरकारने काढून टाकल्यानंतर ही घोषणा करण्यात आली आहे. २००६ च्या अन्न सुरक्षा आणि मानक कायद्याद्वारे मानवी वापरासाठी सुरक्षित आणि पौष्टिक अन्नाची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी अन्नाच्या वस्तूंसाठी विज्ञानआधारित मानके तयार करण्यासाठी आणि त्यांचे उत्पादन, साठवण, वितरण, विक्री आणि आयात यांचे नियमन करण्यासाठी कायद्याची निर्मिती करण्यात आली होती. भारतीय मानक ब्युरो कायदा, २०१६ नुसार बंद बाटलीतील पेयजल हे भारतातील आयएसआय प्रमाणपत्र आवश्यक असलेल्या उत्पादनांपैकी एक आहे. म्हणजेच हे प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे. भारतीय मानक संस्थेद्वारे भारतात विकल्या जाणाऱ्या उत्पादनांसाठी योग्यता प्रमाणपत्र दिले जाते. ते भारतीय मानक ब्युरोने नेमून दिलेल्या मानकांची पूर्तता करते. प्रम णन चिन्हाखाली पॅकेज्ड पिण्याच्या पाण्याची नोंदणी करण्यासाठी यापूर्वी भारतीय मानक ब्युरो कायद्याद्वारे निश्चित केलेल्या काही योग्य म ार्गदर्शक तत्त्वे आणि प्रक्रियांचे पालन करावे लागत होते. केंद्र सरकारने ती सक्ती आता रद्द केली आहे.




याचा परिणाम म्हणून एफएसएसएआयने जारी केलेल्या नव्या नियमानुसार, आता सर्व पॅकेज्ड पेय आणि मिनरल वॉटर उत्पादकांना वार्षिक तपासणीला सामोरे जावे लागणार आहे. कंपनीला परवाना देण्यापूर्वी किंवा नोंदणी करण्यापूर्वी ही तपासणी केली जाईल. शिवाय उत्पादक कंपनीला आपल्या उत्पादन परवान्याचे वार्षिक नूतनीकरण करावे लागेल. पर्यायाने पॅकेज्ड पेय आणि मिनरल वॉटर यांची योग्यता श्रेणी उच्च दर्जाची ठेवावी लागेल आणि ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्डकडून प्रमाणपत्र घेतलेल्या उत्पादक कंपन्यांच्या उत्पादनावर केंद्र सरकारचे नियंत्रण राहू शकेल. याशिवाय अशा प्रकारच्या उच्च जोखमीच्या अन्न श्रेणीतील व्यवसायांना एफएसएसएआयने मंजूर केलेल्या तृतीय-पक्ष अन्न सुरक्षा एजन्सीद्वारे वार्षिक लेखापरीक्षण करावे लागेल. या सगळ्या नव्या नियमावलीद्वारे या उत्पादनांची सुरक्षा आणि गुणवत्ता मानके सुधारणे आणि ग्राहकांना सुरक्षित वस्तू उपलब्ध करून देणे हा सरकारचा प्रामाणिक प्रयत्न आहे असे म्हणणे गैर ठरू नये. प्रत्यक्षात पॅकेज्ड पिण्याच्या पाण्याच्या उद्योगाने यापूर्वी सरकारकडे बीआयएस आणि एफएसएसएआय या दोघांकडून घ्याव्या लागत असलेल्या दुहेरी प्रमाणपत्राची आवश्यकता काढून टाकण्याची विनंती केली होती.

नवीन नियमांमुळे अनुपालन प्रक्रिया सुरळीत होण्यास आणि उत्पादकांवरील भार कमी होण्यास मदत होईल, असा विश्वास तज्ज्ञांना आहे. त्यांच्या मते एफएसएसएआयच्या या निर्णयाद्वारे ग्राहकांना सुरक्षित बाटलीबंद पाणी मिळण्याची हमी मिळणार आहे. कारण पॅकेज्ड पाण्याच्या यूनिटमध्ये पाणी फिल्टर करून स्वच्छ केले जाते आणि त्यामध्ये आवश्यक खनिजे मिसळली जातात. त्याद्वारे उत्पादकांकडून हे पाणी पिण्यायोग्य आणि सुरक्षित आहे याची हमी दिली जाते. त्याचबरोबर पॅकेज्ड पाण्याचे यूनिट सुरू करण्यासाठी आधी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. हे प्रमाणपत्र पॅकेज्ड पाणी पिण्यायोग्य आहे किंवा कसे हे निश्चित करते. ग्राहकांच्या दृष्टीने या नियमांचे म हत्व मोठे आहे. कारण यामुळे बाटलीबंद पाण्याच्या गुणवत्तेचे आणि निर्धारित निकषांचे कटेकोरपणे नियंत्रण केले जाईल.

**मधुरा कुलकर्णी**

आजकाल चहाच्या टपऱ्यांपासून मोठमोठ्या हॉटेलांमधून बाटलीबंद पाणी आणि शीतपेय मिळू लागली आहेत. अशा परिस्थितीत नामवंत कंपन्यांच्या उत्पादनांमध्ये भेसळ होण्याची किंवा प्रतीउत्पादन होण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत त्यात चांगल्या प्रकारचे पाणी वापरले जाणे, पाणी अथवा शीतपेयांच्या बाटल्या सीलबंद करताना आरोग्याच्या दृष्टीने खबरदारी घेतली जाणे या अपेक्षाच चुकीच्या आहेत. महानगरांमधून दुधाच्या पिशव्या, तुपाचे डबे यातून होत असलेल्या भेसळीचे प्रकार अधून मधून समोर येत असतात. या अपराधीक वृत्तीवर अंकुश राहण्यासाठी आणि आपल्या जीवाशी संबंधित असलेल्या पाण्यासारख्या जीवनावश्यक गोष्टीसाठी कडक कायदे आणि त्यांची काटेकोर अंमलबजावणी आवश्यक आहे. अशा वेळी लाचखोरीलाही आळा बसणे तितकेच गरजेचे आहे. मिनरल वॉटरचे उत्पादन आणि वितरण करणाऱ्या संस्थांवर आणि त्यांच्या व्यवहारांवर सरकारी यंत्रणांचे गांभीर्यपूर्वक लक्ष असणे गरजेचे आहे. कारण, व्यवस्थेमधील त्रुटी नियमांच्या गांभिर्याला कमकुवत करतात. आज सरकारे करत असलेल्या निवडींचाही लाचखोरीच्या प्रमाणात प्रभाव पडतो. कायद्याने पद्धतीमध्ये बदल आणि त्याची अंमलबजावणी जरूर करता येते. कायदा परिस्थिती बदलू शकतो, पण त्याला आबालवृद्धांच्या जीवाशी संबंधित विषयांवर प्रशासनाची साथ असावी लागते.

अन्नपदार्थांच्या दर्जावर नियंत्रण ठेवण्यासाठी अन्नभेसळ प्रतिबंधक कायदा १९५४ पासून २०११ पर्यंत लागू होता. या कायद्याची जागा आता २९ नोव्हेंबर २०२४ च्या नवीन कायद्याने घेतली आहे. यामध्ये संपूर्ण देशभरात अन्नपदार्थांवरील नियंत्रणात सुसूत्रता आणली जाते. पूर्वीच्या अन्नभेसळ प्रतिबंधक कायद्याचा मुख्य उद्देश औषधे आणि पाणी वगळता इतर सर्व खाद्यपदार्थ आणि पेये दूषित होऊ नयेत हा होता. नवीन कायद्याप्रमाणे आता बाटलीबंद पाणी हे उत्पादन त्यात समाविष्ट केले गेले आहे. आणि त्यानुसार अन्न भेसळ रोखण्यासाठी राज्ये/केंद्रशासित प्रदेशातील अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांकडून खाद्यतेलासह सर्व द्रवरूपी उत्पादनांचे नियमित परीक्षण, निरीक्षण, तपासणी आणि यादृच्छिक नमुने घेण्यात येत असून २९ नोव्हेंबर २०२४ च्या कायद्यानुसार कारवाई करण्यात येत आहे. आज अन्नपदार्थांची भेसळ सर्रास झाली असून दुष्टता इतकी व्यापक पसरली आहे की नवीन कायद्यात नमूद केलेल्या काहीशा कठोर उपायांशिवाय परिस्थिती बदलण्याची अपेक्षा करता येणार नाही. अन्न आणि जल भेसळीच्या अत्यंत समाजविघातक वर्तनावर ठोस आणि दृढनिश्चय करूनच दिलास्याची आशा बाळगता येईल. यासाठी नवीन कायदा प्रभावी होण्यासाठी असलेले सर्व उपाय योजले गेले पाहिजेत.

## चर्चा आजची

# स्वागत नव्या वर्षाचे, नव्या सूर्याचे!



मावळत्या सूर्याच्या संगतीने आयुष्यातील अजूक एक वर्ष सरलं. सरत्या वर्षात काय कमाविले, काय गमाविले, याचा हिशेब प्रत्येकाजवळच असतो. म्हणूनच आजचा सूर्य अरुणोदय असेल. नवीन वर्षाचा आजचा पहिला दिवस. आजपासून सुरू झालेल्या नवीन वर्षाचे सर्वांनीच स्वागत करूया. नवीन वर्षाच्या सूर्यनारायणाचे स्वागत करताना अनेक जण आज अनेक नवे संकल्प सोडतील. कोणी आजपासून नियमित सकाळी फिरायला जाण्याचा. कोणी नव्या वर्षात नियमित व्यायामाचा, तर कोणी वाचन, लेखनाचा. नवीन वर्ष सुरू होत असताना आपल्या सर्वांमध्ये जो उत्साह अगदी ठासून भरलेला असतो, त्या उत्साहाच्या भरात हे संकल्प सोडले जातात. पण, त्याची पूर्ती होते का? वर्ष संपल्यानंतर मागे वळून पाहताना नवे कॅलेंडर आठवते. आणि मग आठवतो.. नेमेची येणारा.. संकल्प!

**राकेश लोहार**

खरे पाहिले तर, कालचा आणि आज उगवलेला सूर्य यात फार काही फरक नाही. व्यक्तिगत जीवनात एक स्वयंशिस्त लावणे ज्यांना जमते, त्यांना उगवलेला प्रत्येक दिवस सारखाच असतो आणि त्या प्रत्येकाच्या जीवनात नवा आनंद, नवा उत्साह घेऊन येत असतो. ज्यांना अत्यंत निष्ठेने जीवन जगायचे आहे, काही वाकडे तिकडे वागायचे नाही, अशा बहुसंख्य लोकांना कोणताही दिवस अशुभ नाही. प्रत्येक दिवसाचा सूर्य हा तेजस्वी आहे, तसाच तो प्रत्येकाला कार्यप्रवण करणारासुद्धा आहे. तो आहे म्हणून हे जग कामाला लागते आणि जगामध्ये एकही दिवस विश्रांती न घेणारा तो एकमेव आहे. प्रत्येक दिवस चांगलाच आहे. काळाच्या उदरात हजारो वर्षे फस्त होत असताना, या पृथ्वीवरील प्राणी जसे होते तसेच राहिले, त्यांची क्रूरता कमी झाली नाही, पण माकडाचा माणूस झाला आणि माणसाचा शास्त्रज्ञ झाला. इथे माणसाचे मोठेपण सिद्ध झाले आहेत. केवळ नव्या वर्षाच्या नव्या दिवसाने माणसाच्या जीवनात नवी नवलाई आणलेली नाही, तर रोज उगवणाऱ्या प्रत्येक दिवसाने माणसाला काही नवीन शिकवलेले आहे. माणसाने काही नवीन शोधून काढलेले आहे आणि ते जगाला दिलेले आहे. त्यामुळे दिवसागणिक प्रत्येक क्षेत्रात नवी क्रांती घडत आहे. निसर्गनियमानुसार सृष्टीचे कालचक्र फिरत असते. या कालचक्राचा एक भाग म्हणजे नवीन वर्षाची सुरुवात. मागची वर्षे झपाट्याने मागे पडली. आपल्या आयुष्यावर या वर्षाने काय प्रभाव टाकला, हे जसे एखाद्या माणसाला मोजता येणे शक्य असते, तसे या एका वर्षात आपण काय केले, याचे गणित मांडणे सहज शक्य आहे. म्हणूनच कटू प्रसंग, त्या वर्षातली दुःखं, हे सगळे विसरुन नवीन वर्षाचे स्वागत करताना नवा उत्साह, नवा जोष, नवी ईर्ष्या, नवी एकाग्रता, नवी संकल्पना घेऊन माणसाने उभे राहावे आणि नव्या जोमाने कामाला लागावे.

गोड-कडू आठवणींची शिदोरी सोबत देऊन सरते वर्ष जाता-जाता जगण्याचा धडा शिकवून नक्कीच गेले. सरत्या वर्षात अनेक आघात, अपघात झाले. यामध्ये कुणी वाचले, कुणी गेले, काही ठिकाणी तर घराचा पोशिंदाच हरवला. यामुळे अनेकांना हादराही बसला आहे. कुठे संप, कुठे मोर्चे, कुठे औषधांचे घोटाळे, कथित ईव्हीएम घोटाळ्यांमुळे लोकशाहीची झालेली हत्या, वाढत्या महागाईने सर्वसामान्यांचे मोडलेले कंबरडे यामुळे आर्थिक चक्रच पुरते कोसळले आहे. यातूनही वाट काढत, सावरत आपण नव्या वर्षात पाऊल टाकले आहे, ते नवी स्वप्नं पाहण्यासाठी, नव्याने उभे राहण्यासाठी. सरत्या वर्षाला गुडबाय करताना आणि सूर्यापासून मिळणारी ऊर्जा घेऊन नवीन वर्षाला सामोरे जाणे आणि नवीन काही तरी करणे, हीच आजची अपेक्षा आहे. बऱ्या-वाईट गोष्टी, आठवणी मागे सोडत आपण सर्वांनी नव्या वर्षात प्रवेश केला आहे. सरत्या वर्षाला निरोप देताना नव्या वर्षाच्या स्वागताचा उत्साह कमी होऊ नये. झाले गेले गंगेला मिळाले. चांगल्या-वाईट घटना घडतच असतात, त्याकडे आपण कसे पाहतो, हे महत्त्वाचे ठरते. कारण, गेलेल्या गोष्टींवर चिंता करुन वेळ आणि ऊर्जा फुकट घालवण्यापेक्षा त्याचा सकारात्मक दृष्टीने उपयोग करुन घेतल्यास नक्कीच येणारे वर्ष सुख, समाधानाचं जाईल, यात वाद नाही. म्हणूनच उगवत्या सूर्याला सलाम करुन पुन्हा नव्याने उभे राहूया, हीच मनोकामना नववर्षाभिनंदन करताना व्यक्त करतो.

## लोकसंसद

# नवीन वर्षाचे स्वागत!

२०२४ चे वर्ष कडूगोड आठवणी मागे सोडून जात असताना या वर्षातील नकारात्मक गोष्टींना तिलांजली देऊन चांगल्या गोष्टींना उजाळा देत नव्या उमेदीने २०२५ या नव्या वर्षाचे स्वागत करण्यासाठी सर्वसामान्य जनता सिद्ध झाली आहे. गेले वर्ष २०२४ हे वर्ष प्रामुख्याने निवडणुकांचे वर्ष होते. त्यामुळे हे वर्ष अत्यंत धामधुमीचे गेले. आधी लोकसभेची निवडणूक व नंतर महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक झाली. केंद्रात आणि राज्यात भाजपप्रणित नवीन सरकारे सत्तारूढ झाली. आता सरत्या वर्षातील शेतकरी आत्महत्या, कायदा सुव्यवस्था, महिला सुरक्षा, बेरोजगारी आणि महागाई अशा आर्थिक आणि सामाजिक समस्या सोडविण्याचे आव्हान नव्या वर्षात नव्या सरकारांना पेलावे लागणार आहे. नव वर्षात सरकारकडून रस्ते, लोहमार्ग, बंदरे, विमानतळ अशा विविध पायाभूत सुविधा, नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग, उद्योगधंद्यांसाठी प्रोत्साहन, शिक्षण क्षेत्रातील सुधारणा, आरोग्य क्षेत्रातील सुधारणा अशा गोष्टींना गती मिळेल अशी सर्व सामान्यांची अपेक्षा आहे. अशावेळी आपले स्वतःचे जीवनमान अधिकाधिक सुकर कसे होईल यासाठी येणाऱ्या २०२५ वर्षाकडे सकारात्मक दृष्टीने पाहूया आणि कवी केशवसुतांच्या 'तुतारी' या कवितेतील 'जुने जाऊ द्या मरणा लागुनि' 'सावध! ऐका पुढल्या हाका' या ओळी आठवून नवीन वर्षाचे स्वागत करूया!

**- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी**

# हळद क्षेत्र घटले

हवामानातील सततचे बदल, कोठे कमी तर कोठे मोठा असे पावसाळ्याचे स्वरूप तर नेमके हळद लागवडीच्या वेळेस मोठे तपमान यामुळे हळद लागवडीवर विपरीत परिणाम झाला. यातच हळदीच्या बियांची कमतरता व त्याचे वाढते दर यामुळे हळदीची पीक लागवड कमी झाली आहे. २०२३-२४ मध्ये हळदीची लागवड ३ लाख ५ हजार १८२ हेक्टर एवढ्या पिकावर झाली होती. यंदा देशात २ लाख ७० हजार हेक्टर वर लागवड झाली आहे. जून महिन्यापासून पावसाळा सुरु झाला सतत पावसामुळे शेतकरी हळद वेळेवर लागवड करू शकले नाहीत. पावसाळा जरा कमी होताच लागवड केली गेली ही बातमी नुकतीच वाचली. एकूणच देशातील हळद उत्पादन सुद्धा घटण्याची शक्यता आहे. त्यामुळे यंदा हळदीचे उत्पादन कमी व मागणी जास्त अशी परिस्थिती होणार आहे. याचा परिणाम हळदीच्या दरावर सुद्धा होऊ शकतो.

- शांताराम वाघ, पुणे

## दिनविशेष

# कालबाह्य ठरतंय एकत्र कुटुंब पद्धती

पूर्वी समाजात एकत्र कुटूंब पध्दत होती. कुटूंबातील ज्येष्ठ मंडळींपासून सर्वच जण एकत्र राहत होते. आपले सुखदुःख एकमेकांसोबत व्यक्त करीत होते. परंतु शिक्षण, नोकरी व्यवसायानिमित्त अनेकजण घर सोडून बाहेर गेले. त्यामुळे फ्लॅट पध्दत विकसीत झाली. आम्ही दोन आणि आमचे दोन या भुमिकेतून राहण्याची सवय सुरु झाली. त्यामुळे एकत्र कुटूंब पध्दत हळूहळू कालबाह्य होऊ लागली. बदलत्या राहणीमानामुळे अनेकजण फ्लॅटपध्दतीने राहण्यावर भर देत आहेत. फक्त सणासूदीच्या दिवशी एकत्र येतात. मात्र त्यामध्ये कुटूंबाचा जिव्हाळा दिसून येत नाही. गेल्या काही वर्षापासून मोबाईलचे जग सुरू झाले.



प्रत्येकाच्या हातात मोबाईल आला. या मोबाईलच्या आहारी गेल्याने आजूबाजूला असलेली कुटूंबेदेखील दुर होऊ लागली आहे. मोबाईलमधील सोशल मिडीयामुळे जग जवळ आले असले, तरी या मोबाईलमुळे अनेकजण एकमेकांपासून दूर होऊ लागली आहेत. मोबाईलच्या जगतामध्ये रमणाऱ्या मंडळींना बाजूला असूनदेखील आपली व्यक्ती दिसत नाही ही मोठी शोकांतिका आहे. आज १ जानेवारी हा दिवस संपूर्ण जगात नववर्ष म्हणून साजरा केला जातो. तसेच आजचा दिवस हा जागतिक कुटुंब दिन म्हणूनही साजरा केला जातो. आपण नव्या वर्षाचे नवे संकल्प करतो मात्र, नवीन वर्षाचे वैयक्तिक संकल्प करण्याऐवजी, कुटुंब म्हणून संकल्प करायला हवेत. कारण आजच्या या इंटरनेटच्या काळासाठी हे गरजेचे आहे. आजच्या काळात आपण अर्धा अधिक वेळ कामात घालवतो आणि कामाच्या तणावात जातो. ही परिस्थिती लक्षात घेऊन जागतिक कुटुंब दिनाची स्थापना करण्यात आली आहे. जागतिक शांतता, समुदाय आणि कुटुंबे यांच्यातील संबंध म्हणजे जागतिक कुटुंब दिन. प्रेमळ कुटुंबासाठी शांतता आवश्यक आहे, म्हणून या दिवसाची स्थापना करण्यात आली आहे. आणि हा दिवस जागतिक स्तरावर साजरा केला जातो. संपूर्ण जगात शांतता प्रस्थापित करणे थोडे कठीणच आहे. मात्र, व्यक्ती आणि कुटुंबांनी स्थानिक पातळीवर शांततेत एकत्र राहिल्याने जगात शांतता प्रस्थापित करणे सोपे होऊ शकते. २० व्या शतकाच्या अखेरीस जागतिक शांततेच्या प्रयत्नांतून जागतिक कुटुंब दिन विकसित झाला. १९९७ मध्ये, युनायटेड नेशन्स जनरल असेंब्लीने जगातील मुलांसाठी शांतता आणि अहिंसा संस्कृतीसाठी आंतरराष्ट्रीय दशक सुरू करण्याची योजना सुरू केली.

**जागतिक कुटुंब दिन कसा साजरा करावा**

वैयक्तिक संकल्प करण्याऐवजी, कुटुंब म्हणून संकल्प करावेत. यामध्ये आपण कुटूंबातील एकमेकांची काळजी घेण्याची, एकत्र प्रेमाने आनंदात राहण्याचे वाचन देऊ शकतो. एकत्र वेळ घालवण्यासाठी काही विशेष दिवसांनी किंवा महिन्यांनी सहलीचे नियोजन करू शकतो. एकमेकांची सुख-दुख शेयर करू शकतो. एखाद्या संस्थेला, गरिबांना कौटुंबिक मदत करता येईल. एकत्र एखादा चित्रपट बघणे, झाडे लावणे, एकत्र जेवण करणे, बाहेर जाणे, एकत्र खेळ खेळणे, गप्पा मारणे अशा अनेक गोष्टी करून आपण हा दिवस साजरा करू शकतो.

# पुरावे नष्ट केल्यावर वाल्मीक कराड शरण?

## आ. विजय वडेट्टीवार यांचा सवाल



। मुंबई । प्रतिनिधी ।

गेल्या काही दिवसांपासून पोलीस आणि सीआयडी ज्याचा शोध घेत होते तो वाल्मीक कराड अखेर शरण आला आहे. स्वत:च्या गाडीतून तो पुण्यातील सीआयडी मुख्यालयात हजर झाला होता. तिथे त्याची कसून चौकशी सुरू आहे. मात्र, वाल्मीक कराड शरण आल्याने पोलीस आणि सीआयडीच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत. तसेच, काँग्रेसचे आमदार विजय वडेट्टीवार यांनीही एक सोशल मिडीयावर पोस्ट करत पुरावे नष्ट केल्यावर वाल्मीक कराडने सरेंडर केले? असा सवाल उपस्थित केला आहे.

खंडणीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर ही २२ दिवस पोलिस व सीआयडी वाल्मीक कराडला पकडू शकले नाही. इतकेच नाही तर सरेंडर होताना हा कराड स्वतः च्या गाडीतून येतो. महाराष्ट्र पोलीस आणि गृहखात्याचे याहून मोठे अपयश असू शकत नाही. इतके दिवस वाल्मीक कराडला लपायला कोणी मदत केली? कोणाच्या संपर्कात तो होता? कोणाच्या सांगण्यावरून तो शरण आला, या सगळ्यांचे सत्य समोर आले पाहिजे, अशी मागणी विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.


तसेच, या वाल्मीक कराडची हिंमत तर इतकी की शरण होण्याआधी व्हिडिओ पोस्ट करतो आणि स्वत:ला क्लिनचीट देतो, यातून त्याच्या मागे खूप मोठी शक्ती असल्याचे स्पष्ट आहे, असा आरोपही वडेट्टीवार यांनी केला आहे.

> या प्रकरणी पोलिसांनी जे कर्तृत्व दाखवले आहे ते पाहता पोलीस, सीआयडी निष्पक्ष चौकशी करू शकत नाही. त्यामुळे या प्रकरणाची संपूर्ण चौकशी उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांनी केली पाहिजे आणि ही चौकशी बीडच्या बाहेर झाली पाहिजे म्हणजे कोणीही दबाव टाकणार नाही.
> – आ. विजय वडेट्टीवार, काँग्रेस

## सुप्रिया सुळे यांचा सवाल

। मुंबई । प्रतिनिधी ।

वाल्मीक कराडला अटक केली असती तर समाधान मिळाले असते, असे विधान राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या खा. सुप्रिया सुळे यांनी केले आहे. तसेच, वाल्मीक कराडने आधी व्हिडीओ जारी केला आणि आत्मसमर्पण केले, पोलिसांना कराड कुठे होता हे कसे कळाले नाही, असेही सुळे म्हणाल्या आहेत. पुढे त्या म्हणाल्या की, सरकारने त्यांना अटक करायला हवी होती. कराडने केलेले आत्मसमर्पण नाही. कराडने एका माणसाचा खून केला आहे. देशमुख यांच्या कुटुंबीयांचे अश्रू कोणीही विसरणार नाही. कराडने एक व्हिडीओ जारी केला पण तो पोलिसांना सापडत नाही हे धक्कादायक आहे. माझा महाराष्ट्राच्या पोलिसांवर प्रचंड विश्वास आहे. बीड आणि परभणी प्रकरणात पीडित कुटुंबांना न्याय देण्याची जबाबदारी आपली आहे, असेही सुप्रिया सुळे म्हणाल्या.



## नक्की कोण कुणाचा आका?

### संजय राऊत यांचा सवाल

। मुंबई । प्रतिनिधी ।

बीडमधील मस्साजोग गावचे संरपंच संतोष देशमुख यांची हत्या केल्या प्रकरणी तसेच पवनचक्की खंडणी प्रकरणी वाल्मीक कराड हे गेल्या काही दिवसांपासून फरार होते. या प्रकरणाचा तपास सीआयडीच्या हातात देऊनही पंधरा दिवस उलटले तरी अद्याप वाल्मीक कराड अद्याप पोलिसांच्या हाती लागला नव्हता. त्यामुळे वाल्मीक कराडला कोण वाचवतंय का, असा प्रश्न विचारला जात आहे. वाल्मीक कराड हे मंत्री धनंजय मुंडे यांचे जवळचे असल्याने त्यांनी कराडला पळून जाण्यात मदत केल्याची चर्चा होत होती.

त्यातच आता वाल्मीक कराडचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबतचा फोटो व्हायरल झाला आहे. शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे खा. संजय राऊत यांनी तो फोटो त्यांच्या सोशल मीडिया एकाऊंटवर शेअर करत राज्य सरकारवर टीका केली आहे. व्वा! क्या सीन है? नक्की कोण कुणाचा आका? असा सवाल संजय राऊत यांनी केला आहे. या पोस्टसोबत त्यांनी देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे व अजित पवार यांना टॅगही केले आहे.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१ जानेवारी

१) श्रीम. वंदना पुरूषोत्तम सरपाटील
अलिबाग, १-१-१९४३

२) श्रीमती शैला परशुराम दाबके
बामणगाव, अलिबाग, १-१-१९४२

३) श्री. विश्वनाथ लक्ष्मण पेरेकर
अलिबाग, १-१-१९६१

४) श्रीम. प्रिया दिलीप पांढरपट्टे
चेंढरे, अलिबाग, १-१-१९६३

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन





अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

**आजचे अन्नदाते**



कै. कस्तुर परशुराम पडते, स्मरणार्थ, गुंजीस अलिबाग

# मारहाण प्रकरणी शुक्लाला कोठडी

। कल्याण । प्रतिनिधी ।

कल्याण पश्चिमेतील योगीधाम आजमेरा हाईट्स गृहसंकुलातील मराठी कुटुंबीयांना परप्रांतीयाकडून मारहाण केल्याची घटना घडली होती. या प्रकरणातील आरोपी शासकीय सेवेतील पर्यटन अधिकारी (निलंबित) अखिलेश शुक्ला यांच्यासह सात जणांना रविवारी (दि.२९) कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयातील सुट्टीकालीन न्यायाधीशांनी चौदा दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

याप्रकरणात अखिलेश शुक्ला यांच्यासह त्यांची पत्नी गीता शुक्ला, सुमित जाधव, दर्शन बोराडे यांच्यासह सात जणांना खडकपाडा पोलिसांनी अटक केली आहे. यापूर्वी त्यांना सात दिवसांची पोलीस कोठडी न्यायालयाने दिली होती. त्यानंतर पुन्हा दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. दोन दिवसांच्या पोलीस कोठडीची मुदत संपल्याने त्यांना रविवारी कल्याण न्यायालयात हजर करण्यात आले होते. यावेळी न्यायालयाने मारेकऱ्यांना १४ दिवसांची न्यायलयीन कोठडी सुनावली. त्यामुळे हे सर्व मारेकरी आधारवाडी कारागृहात नेण्यात आले.

शुक्ला हे राज्य शासनाच्या पर्यटन विकास महामंडळात व्यवस्थापक पदावर कार्यरत होते. त्याच्या विरोधांत सर्व पक्षीयांकडून आवाज उठवताच अलीकडेच विधीमंडळात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अखिलेश शुक्ला यांच्या निलंबनाची घोषणा केली होती. तसेच, शुक्ला यांच्या खासगी वाहनावरील अंबर दिवा आरटीओने जप्त केला आहे. या दिव्याचा नियमबाह्य वापर केला म्हणून त्यांना ९ हजार ५०० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

# ठाण्यात बनावटी दारूचा पूर

। ठाणे । प्रतिनिधी ।

नववर्ष स्वागत आणि थर्टी फर्स्टची सर्वत्र धूम पसरली असतानाचा ठाण्यात नकली दारूचा पूर आला असून त्यात परदेशी, बनावट आणि बिना शुल्क दारूची विक्री केल्याचे उघड झाले आहे. या बनावट दारूचा पर्दाफाश करण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने छापेमारी करत डिसेंबर महिन्यात तब्बल २ कोटी रुपयांची बनावट दारू जप्त केली आहे. याप्रकरणी ३९५ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

थर्टी फर्स्टच्या पार्श्वभूमीवर दारूच्या बेकायदा वाहतुकीसह अमली पदार्थ उत्पादन, विक्री करणे, बाळगणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. या कारवाईत पोलिसांनी तब्बल ३९५ गुन्हे दाखल करत २ कोटींहून अधिकचा मुद्दाल जप्त केला आहे. तर, कमी शुल्काची परदेशी दारू विक्री व साठा केल्याप्रकरणी तीन मोठे गुन्हे दाखल केले असून त्यांच्याकडून ६७ लाखांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. त्याशिवाय राज्य उत्पादन विभागाने चार फ्लाईंग स्कोडची नियुक्ती केली आहे. या स्कॉडने १४ विभागीय निरीक्षकांच्या मदतीने हातभट्टी, बेकायदेशीर ढाबे, हॉटेल आणि मद्यनिर्मितीच्या ठिकाणांवर कारवाई करून आतापर्यंत २ हजार ५९२ गुन्हे नोंदवले आहेत. त्यांच्याकडून ११ कोटी २१ लाखांचा मुद्देमाल जप्त केल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क ठाणे विभागाचे अधीक्षक प्रवीण तांबे यांनी दिली.



उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशातून आयुर्वेदिक औषधाच्या नावाने भांगेच्या गोळ्यांची सर्रासपणे विक्री केली जात आहे. या बेकायदेशीर भांगेच्या गोळ्यांची विक्री व साठा केल्याप्रकरणी राज्य उत्पादन शुल्क विभागाने २ जणांवर कारवाई करत गुन्हे दाखल केले आहेत.

## भिवंडीत बांगलादेशी अड्डे उद्ध्वस्त

। ठाणे । प्रतिनिधी ।

घुसखोरी करून भाड्याच्या घरात वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी नागरिकांचे अड्डे भिवंडी पोलिसांनी उद्ध्वस्त केले आहेत. पोलिसांनी धडक कारवाई करत गेल्या २५ दिवसांत जवळपास २३ बांगलादेशी नागरिकांच्या मुसक्या आवळल्या आहेत. त्यांची चौकशी केली असता त्यांच्याकडे कोणतीही कागदपत्रे किंवा पुरावे नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतर पोलिसांनी त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करत गुन्हे दाखल केले आहेत. तर काहींना अटक केली आहे. घुसखोर बांगलादेशींविरोधात पोलिसांचे कोम्बिंग ऑपरेशन सुरू आहे. या मोहिमेदरम्यान पोलिसांना हनुमान टेकडी परिसरात काही बांगलादेशी महिला वेश्याव्यवसाय करत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी छापेमारी करत रोझी गायन, बेगम मोसम्मद, रशिदा खलिफा या तीन महिलांना ताब्यात घेतले. तसेच, कामतघर येथील हनुमाननगर येथून शाहिद अन्सारी याला ताब्यात घेतले.

# ठाण्यात आंबेडकरी अनुयायांचा मोर्चा

। ठाणे । प्रतिनिधी ।

सोमनाथ सुर्यवंशी मृत्यू प्रकरणी अधिकाऱ्यांना बडतर्फ करावे तसेच गृहमंत्री अमित शहा यांना मंत्रिमंडळातून काढावे अशा मागण्या करत ठाण्यातील विविध राजकीय पक्ष, दलित, पुरोगामी संघटनांनी एकत्र येत जोरदार निषेध मोर्चा काढला होता.

परभणी येथे एका समाजकंटकाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यावर दगडफेक करून संविधानाच्या प्रतिकृतीची मोडतोड केली आणि त्या निषेधार्थ सुरू असलेल्या आंदोलनाचे चित्रीकरण करणाऱ्या सोमनाथ सुर्यवंशी या तरुणाला अटक करण्यात आली. यावेळी पोलिसांनी केलेल्या मारहाणीत त्याचा मृत्यू झाला, असे आरोप आंदोलकांनी केले. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेणे ही फॅशन झाली आहे, असे केलेले विधान म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पर्यायाने देशाचा अपमान असल्याचा आरोप करत त्यांना मंत्रिमंडळातून काढून टाकण्याची मागणी आंदोलकांनी केली. मोर्चात आंदोलकांनी घोषणाबाजी केल्याने मोर्चाचा मार्ग असलेला परिसर दणाणून गेला होता.






# महायुती सरकारवर ठाकरेंचा निशाणा

। मुंबई । प्रतिनिधी ।

मुंबईसह राज्यभरातील नागरिकांनी २०२४ वर्षाला निरोप देण्यासाठी आणि नवीन वर्षाच्या स्वागतसाठी पर्यटन स्थळ गाठत जय्यत तयारी करण्यात आली होती. अशात या नवीन वर्षात कोणत्या गोष्टी बदलणार आणि कोणत्या स्थिर राहणार यावर चर्चा सुरू आहेत. अशात या मुद्द्यावरून राजकीय चर्चाही सुरू झाल्या आहेत. विशेष म्हणजे शिवसेना (ठाकरे) पक्षाने याच मुद्द्यावरून महायुती सरकारवर निशाणा साधला आहे. फक्त कॅलेंडर बदलणार आहे, परंतु महायुती सरकारच्या काळातील या गोष्टी बदलतील का? असा सवाल ठाकरे गटाने महायुती सरकारला केला आहे.



सोशल मीडियावर शिवसेना (ठाकरे) पक्षाकडून एक व्हिडीओ शेअर करण्यात आला आहे. त्यात काही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. ज्यामध्ये शेतकरी, महिला अत्याचार, कायदा-सुव्यवस्था, महागाई, तरुणांचा रोजगार आणि मुंबईची लुटमार यांसारखे प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. तसेच, या व्हिडीओला फक्त कॅलेंडर बदलणार आहे, परंतु महायुती सरकारच्या काळातील या गोष्टी बदलतील का? असा सवाल उपस्थित करणारे कॅप्शन दिले आहे.

**शिवसेनेच्या व्हिडीओतील प्रश्न**

- शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबतील का?
- महिला अत्याचार थांबतील का?
- कायदा-सुव्यवस्था अबाधित राखली जाईल का?
- महागाई कमी होईल का?
- तरुणांना रोजगार मिळेल का?
- महाराष्ट्र आणि मुंबईची लूट थांबेल का?

## सुरेश धस यांचा कराडवर निशाणा

। कल्याण । प्रतिनिधी ।

बीडमधील मस्साजोग गावचे संरपंच संतोष देशमुख यांची हत्या केल्या प्रकरणी तसेच पवनचक्की खंडणी प्रकरणत फरार असलेला वाल्मीक कराड हा पुण्यातील सीआयडी कार्यालयात शरण आला. या राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेल्या ॲक्शनमुळे, दाखवलेल्या तत्परतेमुळे शेवटी सीआयडी समोर वाल्मीक कराड यांना समोर यावे लागले. त्यासाठी मी त्यांचे आभार मानतो. आता त्यांच्या प्रॉपर्टी जप्त करण्यासासंदर्भात परवानगी मागितली आहे. या आठवड्यामध्ये किंवा पुढच्या आठवड्यामध्ये प्रॉपर्टी ॲटॅच केल्या पाहिजे. लवकरात लवकर यांच्या प्रॉपर्टी जप्त झाल्याच पाहिजे त्याशिवाय यांचे आका जे अन्य गुन्हे करत होते ते उघडे पडणार नाहीत, असे सुरेश धस म्हणाले आहेत. तसेच, सीआयडीचे टॉपचे अधिकारी तपास करत आहेत. प्रॉपर्टी ॲटॅचची भीती, घरादारापर्यंत पोलीस पोहोचले. इतर ठिकाणी उचला उचली व्हायला लागली. शेवटी माणून किती दिवस तग धरणार. त्यामुळे ते शरण आले ते काही स्वखुशीने आलेले नाही, असेही सुरेश धस म्हणाले आहेत.

## राणे यांना मंत्रिपदावरून हटवा

### अतुल लोंढे यांची मागणी

। मुंबई । प्रतिनिधी ।

केरळ म्हणजे मिनी पाकिस्तान आहे, तेथील अतिरेक्यांच्या मतांवरच प्रियांका गांधी निवडून आल्या, असे आक्षेपार्ह वक्तव्य महायुती सरकारमधील मंत्री नितेश राणे यांनी केले होते. त्यानंतर काँग्रेसमध्ये प्रचंड संताप व्यक्त होत असून राणे यांना मंत्रिपदावर राहण्याचा अधिकार आहे का, असा सवाल करत त्यांना मंत्रिपदावरून हटवण्यात यावे, अशी मागणी काँग्रेसने केली आहे.

देशाची एकता व अखंडता राखण्याची शपथ घेऊन मंत्री झालेले नितेश राणे हिंदुस्थानातील राज्य असलेल्या केरळला पाकिस्तान म्हणतात आणि भाजपला मतदान न करता काँग्रेस व इतर विरोधी पक्षांना मतदान करणाऱ्यांना दहशतवादी म्हणतात. अशा व्यक्तीला मंत्रिमंडळात राहण्याचा अधिकार आहे का, असा सवाल प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केला आहे.

राष्ट्र प्रथम म्हणणाऱ्या भाजपने याबद्दल स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणीही त्यांनी केली आहे. नितेश राणे यांचे विधान पुरोगामी महाराष्ट्राची प्रतिमा कलंकित करणारे असून भाजपा व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर खुलासा करावा, असेही लोंढे यांनी म्हटले आहे.



## फरार अर्शद खानला अटक

। ठाणे । प्रतिनिधी ।

घाटकोपर होर्डिंग दुर्घटनाप्रकरणी फरार असलेल्या अर्शद खानला मुंबई गुन्हे शाखेच्या विशेष पथकाने उत्तर प्रदेश येथून अटक केली आहे. पोलिसांनी अर्शदला चौकशीसाठी समन्स बजावले होते. मात्र, तो चौकशीसाठी येत नव्हता. त्याला अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले होते. न्यायालयाने त्याला पोलीस कोठडी सुनावली आहे. मुंबईत झालेल्या अवकाळी पावसामुळे घाटकोपर येथील होर्डिंग पेट्रोल पंपावर पडले होते. त्यात १७ जणांचा बळी गेला होता.

## ‘राजकीय हस्तक्षेपामुळे पोलीस हतबल’

। मुंबई । प्रतिनिधी ।

मुंबई पोलिसांची तुलना स्कॉटलंड यार्डशी केली जायची. अशा सक्षम पोलीस दलाची अवस्था सध्या दयनीय झाली आहे. बीडमधील संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी २० दिवस पोलीस व सीआयडीला सापडला नाही, तो शरण आला हे पोलीस दलाचे अपयशच असल्याचे मत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी मांडले आहे.



लोंढे म्हणाले की, राज्यातील पोलीस दल व सीआयडी आजही सक्षम आहेत. परंतु ते राजकीय दबावाखाली असल्याने त्यांचे मनोबल कमजोर होते. आरोपी शरण येतो मात्र त्याला पकडू शकत नाही ही लाजीरवाणी व दुर्दैवी बाब आहे. बीडमधील गुन्हेगारीला आळा घालून राजकीय आशिर्वादाने फोफावलेली ही विषवल्ली कायमची नष्ट करा, असे अतुल लोंढे म्हणाले आहेत.

### महाराष्ट्र जीवन प्रधिकरणामार्फत मान्यता | जवाहर नेहरू पोर्टकडून निधी उपलब्ध

# वाढवण बंदर पाणीपुरवठा योजनेला सुरवात

। पालघर । प्रतिनिधी ।

हरित वाढवण बंदरासाठी लागणाऱ्या पाण्याच्या सुधारित पाणीपुरवठा योजनेचा परिपूर्ण आराखडा तयार झाला आहे. वाढवण बंदर पाणीपुरवठा योजना ही जवळपास ३२८ कोटींच्या घरात असून या योजनेला महाराष्ट्र जीवन प्रधिकरणामार्फत तांत्रिक मान्यता देण्यात आली आहे. योजनेच्या कामासाठी निविदा प्रक्रियेला सुरुवात झाली आहे.

डहाणू तालुक्यातील वाढवण समोरील समुद्रात हरित वाढवण बंदर प्रकल्प उभारला जाणार आहे. बंदराच्या विविध टप्प्यांच्या उभारणीसाठी निविदा प्रक्रिया सुरू आहेत. त्यातच बंदर उभारणीसाठी पाण्याची प्राथमिक आवश्यकता लक्षात घेऊन डहाणू तालुक्यातील सूर्या नदीतून गारगाव भागातून पाणी योजना प्रस्तावित होती. मात्र, या योजनेला पाण्याचे आरक्षण न मिळाल्याने सुधारित योजनेनुसार कुर्झे धरणातून पाणी उचल करण्याचे निश्चित करण्यात आले. त्यानुसार या धरणातून वाढवण बंदर प्रकल्प पाणीपुरवठा योजनेसाठी पाणी आरक्षित करण्याला मान्यताही मिळाली आहे.

सूर्या नदीवरून योजना प्रस्तावित होती. तेव्हा योजनेचा खर्च २२६ कोटींच्या जवळपास होता. मात्र, आता पाणी कुर्झे धरणातून आणण्यात येणार असल्याने योजनेची किंमत अंदाजे ३२८ कोटी झाली.

सुधारित योजनेचा आराखडा महाराष्ट्र जीवन प्रधिकरणामार्फत तयार करण्यात आला असून त्याला तांत्रिक मान्यता आहे. मात्र, काही मान्यता प्रलंबित आहेत. सुधारित पाणीपुरवठा योजनेनुसार कुर्झे धरणातून १५.२३ दशलक्ष घनमीटर इतके पाणी आरक्षित करण्यात आले आहे. बंदरासाठी ६.१८ दलघमी तर बंदराच्या वसाहतीसाठी ९.५ दलघमी पाणी आरक्षित करण्यात आले आहे. या आरक्षणाला जलसंधारण/जलसंपदा विभागाने मान्यता दिली आहे.

> २२४ कोटी मंजूर निविदा चालू आहे. कुर्झे धरणातून पाणीपुरवठा योजना निधी हा जवाहर नेहरू पोर्टने निधी उपलब्ध करून दिला आहे. १३४.४२ कोटी रु. निविदा प्रक्रिया महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून प्रगतीत आहे. पहिला टप्पा चालू झाला आहे.
> – अजय मूल्ये, कार्यकारी अभियंता



**योजनेत समाविष्ट**

वाढवण बंदर प्रकल्प पाणीपुरवठा योजनेंतर्गत कुर्झे धरण परिसरात जॅकवेल व पाणीभरण विहीर यासह मुख्य जोड वाहिनी व काही ठिकाणी लागणारे जोड पूल तसेच २३ दलघमी क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र, ब्रेक प्रेशर टँक, गुरुत्वाकर्षण आधारित योजनेतील काही यंत्रणा, पाणी उचल पंप, मोठी-लघु-मध्यम प्रकाराच्या पुरवठ्याचे सूक्ष्म नियोजन, जलवाहिनीसाठी छोटे बोगदे व जोड रस्ते असे भाग पाणीपुरवठा योजनेचे असणार आहेत.

## निवडक



### जेएम म्हात्रे संस्थेच्या स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन

**चिरनेर :** जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था, कोळी समाज विद्या संकुलन, प्राथमिक शाळा व न्यू इंग्लिश स्कूल मोरा यांच्या संयुक्त विद्यमाने वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ शुक्रवारी (दि.२७) संपन्न झाला. मुख्याध्यापक सुधीर मुंबईकर यांनी प्रास्ताविक, तर मुख्याध्यापक साईनाथ गावंड यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मुख्याध्यापक रामनाथ कोळी यांनी भूषविले होते. कार्यक्रमाला जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था पनवेलचे अध्यक्ष प्रीतम म्हात्रे यांची विशेष उपस्थिती लाभली होती. तर व्यासपीठावर डॉ. प्रशांत पाटील, राजेंद्र कोळी, जयवंत मढवी, राजाराम पाटील, किरण शिंगटे, जविंद्र कोळी, दिलीप मुंबईकर, परशुराम कोळी आदीजण उपस्थित होते. यावेळी पाहुण्यांच्या हस्ते रांगोळी व विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना पारितोषकांचे वितरण करण्यात आले. यावेळी प्रीतम म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



### अध्यक्षपदी हेमंत शेट

**माणगाव :** कोकण विशानेमा ज्ञाती मंडळाच्या अध्यक्षपदी माणगाव येथील सामाजिक कार्यकर्ते तथा नगरपंचायतीचे माजी नगरसेवक हेमंत विष्णुदास शेट यांची (सन २०२५-३०) या पाच वर्षांकरिता माणगाव तालुक्यातील इंदापूर येथे शनिवार, दि.२८ डिसेंबर रोजी झालेल्या समाजाच्या अधिवेशनात एकमताने निवड करण्यात आली. हेमंत शेट यांच्या या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. या अधिवेशनाला राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी भेट देऊन समाज बांधवांना तसेच नूतन अध्यक्ष हेमंत शेट व संपूर्ण कार्यकारिणी यांना शुभेच्छा दिल्या. या मंडळाच्या उपाध्यक्षपदी संगीत दोशी, सेक्रेटरी सपना मेथा, सहसेक्रेटरी गीता मेथा, खजिनदार शाम गांधी, विश्वस्त डॉ.अजय मेहता, अध्यक्ष प्रदीप गांधी, नीता शेट, कार्यकारिणी सदस्य अशी एकूण ३५ जणांची कार्यकारिणी एकमताने निवडण्यात आली. सर्व कार्यकारिणी सदस्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.



### विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप

**रसायनी :** विद्या प्रसारिणी सभा चौकचे संस्थापक स्वातंत्र्यसैनिक कै. नटवरलाल लल्लुदास शहा (दादा) यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर व यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालय चौकमधील विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. दादांचे सुपुत्र व संस्थेचे सचिव योगेंद्र नटवरलाल शहा यांच्या हस्ते पाचवी ते बारावीपर्यंतच्या एकूण १२०० विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. यावेळी स.ने.पा विद्या मंदिर चौक व यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालय चौकचे प्राचार्य श्री भोमले सर, मुख्याध्यापिका पुजारी मॅडम, पर्यवेक्षक श्री. मोळीक व शिक्षक उपस्थित होते.



### पाणीटंचाईचे भीषण संकट

**पनवेल :** तालुक्यातील ग्रामीण भागात अद्यापही पाणीप्रश्न कायम आहे. याचे विदारक चित्र दिसून येत आहे. पावसाळा संपून दोन महिनेसुद्धा होत नाहीत, तोच पाणीटंचाईच्या झळा येथील जनतेला सोसाव्या लागत आहेत. त्यामुळे प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. वर्षभरात या पाणीसमस्येकडे लक्ष द्यायला प्रशासनाला वेळच मिळाला नसल्याने ही परिस्थिती ओढावल्याचे येथील जनतेचे मत आहे. आज वर्षाचा शेवटच्या दिवशीसुद्धा नवीन पनवेल परिसरात पाणीसमस्या गंभीर आहे. त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या पाईप लाईन्स कुठे फुटलेल्या असतील त्यातून पाणी भरून नेण्याची वेळ येथील महिलांवर आली आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● अलिबागमध्ये नामांकित टू व्हीलर शोरुममध्ये अनुभवी मॅकेनिक पाहिजे व शोरुममध्ये काम करायला बाई पाहिजे. (संपर्क : ७५१७७०१८५८/९८२२०६३१६६)

● मेडिकल अेजन्सीज पिंपळभाट येथे कामासाठी मुले व मुली १० वी ते १२ शिक्षण असलेल्या अलिबाग जवळील राहणाऱ्या स्टॉफची जागा खाली आहे. व Driver ची जागा खाली आहे. मो. ९६२३३६६७७८

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# रायगडात पोपटीचा घमघमाट



## थर्टी फर्स्टसाठी पर्यटकांची पोपटीला पसंती; वेगवेगळ्या लज्जतदार ट्रेंडमध्ये उपलब्ध

**| पाली/गोमाशी| वार्ताहर |**

**थर्टी फर्स्टचे बेत सर्वत्र रंगू लागले आहेत. आणि या थर्टी फर्स्टला पोपटी पार्टीशिवाय रंगत नाही. शिवाय, पर्यटकांचा राबतादेखील रायगडमध्ये मोठ्या प्रमाणात येऊ लागला आहे आणि या पर्यटकांनादेखील पोपटीची टेस्ट भारी आवडते. रायगड जिल्ह्यात पोपटी प्रसिद्ध आहे. सध्या येथे पोपटीचे वेगवेगळे ट्रेंडदेखील सुरू आहेत. आणि या अनोख्या प्रकारच्या पोपटीची मागणीदेखील खूप आहे. शाकाहारी व मांसाहारी पोपटीचा सर्वत्र घमघमाट सुटला आहे.**





विदर्भात, खानदेशात ज्याप्रमाणे ज्वारी व बाजरीच्या कणसांना भाजून केलेला हुरडा प्रसिद्ध आहे, त्याप्रमाणेच जिल्ह्यामध्ये गावठी वालाच्या शेंगांची वैशिष्ट्यपूर्ण व लज्जतदार पोपटी प्रसिद्ध आहे. वालाच्या शेंगा भामरुडाच्या (भांबुर्डी) पाल्यात मडक्यामध्ये मोकळ्या आगीवर विशिष्ट पद्धतीने शिजवल्या जातात. यालाच पोपटी असे म्हणतात. काही ठिकाणी मडक्याऐवजी पत्र्याचा डब्बासुद्धा वापरला जातो. पोपटीत वालाच्या शेंगांबरोबर कांदा, बटाटा, रताळी तसेच अंडी, चिकन, मसाळी व चिंबोऱ्या घालून लज्जत वाढवली जाते. वालाबरोबर मटारच्या शेंगा देखील टाकतात. ठिकठिकाणी शेतावर तसेच मोकळ्या जागेवर, फार्म हाऊस व घराबाहेर मोकळ्या जागेत आदी ठिकाणी या पोपटी पार्ट्यांची धूम पाहायला मिळते. काही ठिकाणी काव्यसंमेलन रंगतात, तर गप्पा गोष्टींच्या मैफिलीमध्ये सुखदुःखाची देवाणघेवाणसुद्धा होते. याशिवाय येथील काही हॉटेल व कॉटेज व्यावसायिकांनी आपल्या मेनूमध्ये पोपटीचा समावेश केला आहे.

### निडीच्या गावठी शेंगांना पसंती

**मुंबई-गोवा महामार्गावर नागोठण्याजवळील निडी गावातील शेंगा विशिष्ट गोड चव व टपोरे दाण्यांसाठी सर्वत्र प्रसिद्ध आहेत. निडीगावच्या परिसरातील जमिनीचा पोत कसदार असून, परंपरागत पद्धतीने जपवूणक करुन ठेवलेल्या बियाण्याचाच वापर येथे केला जातो. या वालाला विशिष्ट गोड चव, शेंगेचा आणि दाण्याचा आकारही मोठा. बांधावर आलेल्या शेंगांची चव तर अधिकच रुचकर असते.**

> रायगड जिल्ह्यातील पोपटी हे विशेष खाद्य आहे. शिवाय वेगवेगळ्या प्रकारांमध्ये ते उपलब्ध आहे. थर्टी फर्स्टसाठी खास पोपटीचा बेत आखला जात आहे. जिल्ह्या बाहेरून येणारे पर्यटकांना पोपटी खूप आवडते. रोजगारालादेखील चालना मिळते.
>
> – उमेश तांबट, पर्यटन व्यावसायिक, सुधागड

> शेतात लावलेल्या पावट्याच्या शेंगा वापरून पोपटी बनवली आहे. कारण अजून गावठी वालाच्या शेंगा येण्यास अवकाश आहे. पोपटी पार्टीच्या निमित्ताने घरातील सर्व मंडळी एकत्र येतात. महिला, ज्येष्ठ व लहान मुले विशेष आनंद घेतात. पोपटीचा आस्वाद घेता घेता गप्पागोष्टी रंगतात. या हंगामात दरवर्षी कुटुंबियांसोबत पोपटीचा बेत केला जातो.
>
> – मयुरी रुपेश ठोंबरे, पाली

# शेतकऱ्याला आर्थिक मदत

## बिबट्याच्या हल्ल्यात गायीचा झाला होता मृत्यू

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील नेरळ ग्रामपंचायत हद्दीत धसवाडी येथील शेतकऱ्यांची चारा खाण्यासाठी रानात सोडलेली गाय बिबट्याच्या हल्ल्यात मृत झाली होती. त्या मृत गायीच्या नुकसानीची भरपाई शेतकऱ्याला मिळाली असून, वनविभागाकडून १५ हजार रुपयांचा धनादेश शेतकऱ्याला सुपूर्द करण्यात आला.

धसवाडी येथील शेतकरी आलो महादू दरवडा यांच्या गोठ्यातील गुरे ही नेहमीप्रमाणे जंगलात चारा खाण्यासाठी गेली होती. एक नोव्हेंबर रोजी जंगलातील दली भूखंड १४ ए येथे शेतकरी दरवडा यांची गाय मृत अवस्थेत आढळून आली होती. त्या गायीच्या जबड्याचा धास हिंस्त्र प्राण्याने हल्ला करून घेतला होता. सदर घटनेची स्थानिक कार्यकर्ते सुनील पारधी यांनी वन विभागाला दिली होती. त्यानंतर वन विभागाचे वनपाल सुहास म्हात्रे यांनी आपल्या वन विभागाचे कर्मचारी यांच्यासह घटनास्थळी जाऊन पंचनामा केला होता. संबंधित शेतकऱ्याला मदत मिळावी म्हणून आ. महेंद्र थोरवे यांनी वन विभाग वनक्षेत्रपाल उमेश जंगम यांना सूचित केले होते. वन विभागाने हिंस्त्र प्राण्याच्या हल्ल्यात शेतकरी आलो दरवडा यांची दुभती गाय मृत झाली असल्याचा अहवाल आपल्या वरिष्ठ कार्यालयाला पाठवला होता.

सदर मदतीचा आणि नुकसान भरपाईचा धनादेश वन विभाग नेरळ कार्यालयात शेतकरी आलो महादू दरवडा यांना १५ हजारांच्या मदतीचा धनादेश देण्यात आला. त्यावेळी स्थानिक कार्यकर्ते ग्रामपंचायत माजी सदस्य सुनील पारधी, वनपाल सुहास म्हात्रे, वनरक्षक भूषण साळुंखे आदी उपस्थित होते.

## वृद्ध इसमाचा मृतदेह आढळला

**पनवेल :** पनवेल परिसरात एका ६५ ते ७० वर्षीय इसमाचा मृतदेह आढळला असून, त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. या इसमाच्या अंगात राखाडी रंगाचा फुल बाह्यांचा त्यावर लाल व पांढऱ्या रंगाच्या पट्ट्या असलेला स्वेटर व भगव्या रंगाची अंडरपॅन्ट आहे. अंगाने सडपातळ, चेहऱ्यावर पांढरी दाढी वाढलेली आहे. या इसमाबाबत अधिक माहिती असल्यास त्यांनी पोलीस ठाणे दूरध्वनी क्र.०२२-२७४५२३३३ किंवा स.पो.नि. स्वप्नील केदार यांच्याशी संपर्क साधावा.

# पखवाजवादक किशोर भवारेंचा सन्मान

**| नेरळ | वार्ताहर |**



नेरळ वंजारपाडा येथे राहणारे उत्कृष्ट पखवाज आणि तबलावादक किशोर भवारे यांना आर्ट बिट्स फाऊंडेशन पुणे यांचा राज्यस्तरीय पुरस्कार २०२४ देऊन सन्मानित करण्यात आले आहे. हा पुरस्कार मिळाल्याने किशोर भवारे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

किशोर भवारे हे कर्जत तालुक्यातील अनेक भजन कलाकारांना भजनात पखवाज तसेच तबला वाजवण्याचे काम करत आहेत. कर्जतसह रायगड, ठाणे, पालघर, मुंबई आदी ठिकाणी ते वादक म्हणून अनेक गायकांना साथ देत आहेत. तबला विशारद अनिल गावडे वडाळा (मुंबई) यांच्याकडे ते वादनाचे शिक्षण घेत आहेत. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल आ. महेंद्र थोरवे यांनीदेखील त्यांचा सन्मान केला आहे. किशोर भवारे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

## ट्रकच्या अपघातात चालक जखमी

**| पनवेल | वार्ताहर |**



मुंबई-पुणे महामार्गावर मुंबई लेनवर किमी १/८०० येथे खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत ट्रक पलटी झाल्याची घटना घडली. यात चालक जखमी झाला आहे.

यातील ट्रक क्र. जीजे १६ एव्ही ११३३ वरील चालक सुशील कुमार चेतन भाई पटेल (३१, रा. जम्बुसार, भरूच, गुजरात) हे मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरून मुंबई बाजूकडे वाहन चालवत घेऊन जात असताना किमी १/८०० येथे आले. अचानक त्यांचे ट्रकचा एक्सल तुटल्याने ट्रकचे टायर निघून पडल्याने त्यांचे ट्रकवरील नियंत्रण सुटून ट्रक डाव्या कुशीवर पलटी होऊन अपघात झाला. या अपघातामध्ये ट्रक चालकाच्या उजव्या हाताला खरचटले असून, किरकोळ दुखापत झाली आहे. सदर अपघातग्रस्त वाहन आयआरबी क्रेनच्या सहाय्याने रोडचे बाजूला केले असून, वाहतूक सुरळीत चालू आहे. अपघाताच्या ठिकाणी महामार्ग पोलीस, आयआरबी स्टाफ व पळस्पे मोबाईलवरील स्टाफ हजर होते.

## रिक्षाची चोरी

**| पनवेल | वार्ताहर |**

पनवेल शहरातील प्रभू आळी येथून ४० हजार रुपये किमतीची रिक्षा अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना घडली आहे. अशोक तांबोळी यांनी त्यांची ४० हजार किमतीची बजाज कंपनीची रिक्षा क्र.एमएच-४६-एसी-०४२३ काळी पिवळी ही उषा प्रभा सोसायटीच्या परिसरात उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने ती चोरुन नेली आहे. याबाबतची तक्रार अशोक तांबोळी यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. या रिक्षाचोरीच्या घटनेचा अधिक तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे.

## मातीच्या ढिगाऱ्यामुळे प्रवाशांचे हाल..



**नवीन पनवेल येथे महानगर गॅसने विविध महत्त्वाचे रस्ते फोडून गॅस पाईप लाईन्स टाकण्याचे काम सुरु केले आहे. काही ठिकाणी काम पूर्ण झाले. सेक्टर १३ येथील बस स्टॉपसमोर मातीचे ढिगारे रचून ठेवल्याने बस प्रवाशांना त्रास होत आहे. त्यामुळे रस्ता अरुंद झाला आहे. संबंधित प्रशासन तसेच लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष होत आहे.**

# रविवारी पद्मदुर्ग जागर सोहळा

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

पद्मदुर्ग जागर व गड संवर्धन संस्था मुरुड व कोकण कडा मित्र मंडळ रायगड सर्व संलग्न शिवप्रेमी संस्था यांच्या वतीने पद्मदुर्ग जागर सोहळ्याचे आयोजन रविवार, दि. ५ जानेवारी रोजी करण्यात आले आहे.



(छायाचित्र : गणेश चोडणेकर)

या कार्यक्रमाला रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांच्यासह जिल्ह्याचे खासदार, आमदार यांची प्रमुख उपस्थिती संपन्न होणार आहे. यानिमित्त पुरातत्व विभाग मुरुड बजरंग एरिकर, बंदर निरीक्षक मुरुड प्रमोद राऊळ, तहसीलदार रोहन शिंदे, पोलीस निरीक्षक नामदेव बंडगर, मुख्याधिकारी मुरुड जंजिरा नगरपरिषद सचिन बच्चाव, पौरोहित्य प्रकाश जंगम, कोकण कडा मित्र मंडळ सदस्य शेखर फरमन, पद्मदुर्ग जागर व गड संवर्धन सामाजिक संस्था, मुरुडचे उपाध्यक्ष राहुल कासार, कोकण कडा मित्र मंडळ रायगड उपाध्यक्ष संकेत वडके यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

रविवारी सकाळी ६ वाजता मुरुड राधाकृष्ण मंदिराजवळील समुद्र मार्ग बोटीतून पद्मदुर्ग किल्ल्यात पालखी प्रस्थान, सकाळी ७ ते ९ वाजेपर्यंत गड सजावट, सकाळी १० वाजता गडदेवता पूजन, सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत व्याख्यान, शिवपालखी सोहळा, मर्दानी खेळ, दुपारी १ ते २ वाजेपर्यंत महाप्रसाद, दुपारी २ वाजता पद्मदुर्ग ते बोटीतून प्रस्थान मुरुडकडे प्रस्थान होणार आहे.

## विवाहिता बेपत्ता



**पनवेल :** किरकोळ भांडणाचा राग मनात धरुन एक विवाहित महिला राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. आरती बाळासो यादव (२८, रा. नवनाथनगर झोपडपट्टी) असे या महिलेचे नाव असून, उंची ५ फूट ६ इंच, बांधा मध्यम, रंग गहुवर्णीय, केस काळे असून, डाव्या हाताच्या मनगटावर बाळासो असे गोंदलेले आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पोलिसांशी संपर्क साधावा.

# वाहतूक पोलिसांकडून जनजागृती अभियान

**| पनवेल | वार्ताहर |**



दारु पिऊन वाहन चालवू नका, याबाबत वाहन चालक व मालकांमध्ये जनजागृती करण्यासाठी पनवेल शहर वाहतूक शाखेतर्फे शहरातील वेगवेगळ्या ठिकाणी जनजागृती अभियान राबविण्यात आले.

पनवेल वाहतूक शाखेचे वपोनि संजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मनोज महाडिक व पथकाने आज शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसर, नवीन पनवेल उड्डाणपूल परिसर यासह महत्त्वाच्या गर्दीच्या ठिकाणी मंगळवारी जनजागृती अभियान राबवून दुचाकी तसेच चारचाकी वाहनावरील वाहन चालकांना दारु पिऊन वाहन चालवू नका, असे आवाहन तसेच वाहन चालकाचे प्रबोधन करण्यात आले.

## मासळी खरेदीसाठी खवय्यांची गर्दी | फार्म हाऊस व कॉटेजवर मागणी

# थर्टी फर्स्टनिमित्त मासळीचे भाव वधारले

**| पाली/वाघोशी | वार्ताहर |**

**थर्टी फर्स्टनिमित्त जिल्ह्यात लाखो पर्यटक दाखल झाले असून, हॉटेल्स, लॉजिंग, कॉटेजेस हाऊसफुल्ल झाले आहेत. रायगड जिल्ह्यात ताजी मासळी खाण्यासाठी मोठ्या संख्येने पर्यटक येतात. त्यामुळे थर्टी फर्स्टच्या पार्श्वभूमीवर मासळीचे भाव वधारले आहेत. तरीदेखील मासळी खरेदीसाठी मच्छी मार्केटमध्ये मोठी खवय्यांची झुंबड पाहावयास मिळत आहे.**



### मासळी दर प्रतिकिलो

**(ठिकाणानुसार यामध्ये कमी जास्त भाव आहे) बोंबील - ४०० रुपये पापलेट मध्यम - १००० ते १२०० पापलेट मोठे - १२०० ते १५०० सुरमई - १००० घोळ - १००० रावस - ८०० ते १००० मांदेली - २०० ते ३०० मध्यम कोळंबी - ४०० ते ६०० बांगडा मालवणी - ४०० हलवा - ७०० टोळ - ५०० या शिवाय इतरही वेगवेगळ्या प्रकारचे मासे विक्रीसाठी उपलब्ध आहेत.**

जिल्ह्यात सध्या समुद्रातील मासेमारी जोरात सुरू आहे. मोठ्या प्रमाणात मासळी सापडत आहे. येथे येणारे पर्यटक खाऱ्या पाण्यातील माशांना पसंती देत आहेत. त्यामुळे मासळीचे भावदेखील वधारले असून, थर्टी फर्स्टसाठी अनेकांनी आगाऊ बुकिंगदेखील केली आहे. जिल्ह्याला तब्बल २४० किमी लांबीचा समुद्रकिनारा लाभला आहे. त्यामुळे येथे समुद्रातील ताजी मासळी सहज उपलब्ध होते.

> नाताळ सुट्ट्यांमुळे सध्या पर्यटक मोठ्या प्रमाणात दाखल होत आहेत. तसेच सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी त्यांचा कल मासळी खाण्यावर अधिक आहे. मासळीदेखील मुबलक व ताजी भेटत आहे. त्यामुळे खवय्ये खुश आहेत. परिणामी, विक्रीसुद्धा चांगली होत आहे.
>
> – गौरी मनोरे, मासळी विक्रेत्या, पेण-पाली

# कॅस्ट्रॉलविरोधात शेतकरी आक्रमक

## वारसांचे कुटुंबासह बेमुदत उपोषण सुरू

| रसायनी | वार्ताहर |

पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील कैरे गावचे गोविंद हडकु पाटील,जगन्नाथ दामाजी पाटील व अनंता नामदेव पाटील या प्रकल्पबाधित शेतकऱ्यांची लागवडीखालील जमीन कॅस्ट्रोल कंपनीला त्यावेळी कारखान्यासाठी दिली होती. यावेळी कंपनीने शेतकऱ्यांच्या वारसाला कंपनीत कायमस्वरूपी समाविष्ट करू असे आश्वासन दिल्याचे समजते. परंतु, कंपनीने या शेतकऱ्यांच्या मुलांना कायमस्वरूपी कामावर घेतले नाही, अनेक महिने होऊनही न्याय न मिळाल्याने शेतकऱ्यांच्या वारसांनी दि. ३०डिसेंबरपासून कंपनीच्या गेटजवळ वारस वासुदेव गोविंद पाटील, सचिन अनंता पाटील व मंदार भगवान पाटील व त्यांच्या कुटुंबासह आमरण उपोषण सुरु केले आहे.



(छायाचित्र : राकेश खराडे)

प्रकल्पग्रस्त वारसांची शेतजमीन कॅस्ट्रॉल कंपनीसाठी घेतली असून, सदरची मिळकत हीच त्यांची उत्पन्नाचे साधन असल्यामुळे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे. त्यावेळी शेतजमीन घेताना शेतकऱ्यांना कामगार म्हणून कामावर घेतले व शिक्षण नाही म्हणून त्यांना कंपनी व्यवस्थापनाने कामावरून कमी केले. कंपनी व्यवस्थापनाने सदरचे शेतकऱ्यांस भविष्यात तुमचे वारसांना नोकरी देऊ असे सांगून आश्वासन दिले, परंतु प्रकल्पग्रस्तांच्या वारसांना अद्याप नोकरीत सामावून घेतले नाही.

नोकरीस घेण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ कंपनी प्रशासन करीत असल्याचे सदरचे प्रकल्पग्रस्तांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला असून, आमरण उपोषणाची तयारी ठेवली आहे. स्थानिक प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना कंपनी व्यवस्थापन कामावर घेण्यास तयार नसून या कंपनीच्या आडमुठे धोरणामुळे वारसाचे कुटुंबासह उपोषण राहणार आहे. प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी जीवितास किंवा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी मे. कॅस्ट्रॉल इंडिया लिमिटेडची व कंपनी प्रशासनाची राहील, असा इशारा दिला आहे. यावेळी स्थानिक नेते व सर्व पक्षाने जाहीर स्थानिकांच्या उपोषणास जाहीर पाठिंबा दिला आहे.

> **आंदोलनात सहभागी असलेली व्यक्ती प्रकल्पग्रस्त नाही, त्यामुळे कोणत्याही मोबदल्यासाठी पात्र नाही. आमची भरती प्रक्रिया पारदर्शक आहे आणि सर्व उमेदवारांची निवड गुणवत्तेवर आणि उपलब्ध रिक्त पदांच्या आधारे केली जाते. आम्ही परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवत आहोत आणि सर्व सहभागीच्या सुरक्षिततेसाठी आणि कल्याणासाठी आवश्यक पावले उचलू.**
> **– प्रवक्ते, कॅस्ट्रॉल इंडिया**

> **प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळावा म्हणून आम्ही त्यांच्या पाठीशी आहोत. आम्ही कंपनीला सहकार्याची भावना दाखवतो. कंपनीने प्रकल्पग्रस्त कामगारांना न्याय मिळवून द्यावा. तिघा प्रकल्पग्रस्तांना कामावर कायमस्वरुपी नोकरी मिळावी यासाठी आमरण उपोषण सुरु केले असून, मोठा पाठिंबा मिळत आहे.**
> **– उत्तम भोईर, सामाजिक कार्यकर्ता**

# आयुर्वेदिक चिकित्सा शिबिराला प्रतिसाद



| कर्जत | प्रतिनिधी |

श्री विठ्ठल संस्थान दहीवली आयोजित माजी आमदार तुकाराम सुर्वे यांच्या स्मरणार्थ तुकाराम सुर्वे प्रतिष्ठान, दादर–मुंबईतील ज्योविस आयुर्वेद हॉस्पिटल, नारी सामाजिक संस्था यांच्या सहकार्याने देवस्थानच्या सभागृहात मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबिराचे आयोजन केले होते. या चिकित्सा शिबिरात ३१५ रुग्णांची तपासणी करून त्यांना मोफत औषधे देण्यात आली. या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हे प्रतिष्ठानने आयोजित केलेले तिसावे आरोग्य शिबिर होते.

या शिबिराचे उद्घाटन ज्योविस आयुर्वेदाचे डॉ. राज सातपुते यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून करण्यात आले. याप्रसंगी डॉ. ज्योती सातपुते, श्री विठ्ठल संस्थानचे अध्यक्ष महेंद्र तेरेदेसाई, उपाध्यक्ष निमिष खडपेकर, गिरीश धर्माधिकारी, सुनील नांदुस्कर, दिपंकार सालये, मयूर भागवत, गजानन खडपेकर, प्रतिष्ठानचे मुकेश सुर्वे, मनीषा सुर्वे, पद्मजा देशमुख, वंदना दराडे आदी उपस्थित होते. अध्यक्ष तेरेदेसाई यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

या शिबिरात डॉ. राज सातपुते यांच्यासह डॉ. ज्योती सातपुते,, डॉ. सत्यशील मौर्या, डॉ. अदिती आहुजा, डॉ. सौरभ कुशवाह, डॉ. निकिता सानप, आयेशा वाडकर, डॉ. मिकी सिंग, डॉ. रंजन पोतदार, डॉ. हर्षदा राऊत, डॉ. प्रिया अनिलकुमार, डॉ. प्राची चावडे, आरोग्य सेविका आयेशा वाडकर, मनीषा मीना, सौम्या गुप्ता, रोहित जाधव, रश्मी पटेल, तनिष सोलंकी, नेहा कदम यांनी आरोग्य सेवा दिली. चामखीळ आणि भोवरी हे तत्काळ काढण्यात आले तर पित्त, पाठदुखी, वात, रक्त मोक्षण, आमवात, अग्निकर्म, लकवा आजाराचे रुग्ण यांची चिकित्सा करण्यात आली. बहिरेपणा, सांधे दुखी, कंबर दुखी, गुढघे दुखी आदी व्याधींवर उपचार करण्यात आले. ३१५ रुग्णांची तपासणी आणि चिकित्सा करण्यात आली. या सर्व रुग्णांना मुंबई येथील नारी सामाजिक संघटना यांच्या माध्यमातून सर्व औषधे मोफत देण्यात आली.

याप्रसंगी विजय जिनगरे, वसंत ठाकूर, अशोक कारुळकर, महेश क्षीरसागर, पांडुरंग देशमुख, किरण पाटील, राजेंद्र पाटील, श्याम कुलकर्णी, ज्योती पाटील, वैशाली ठाकरे, रोहिणी सुर्वे, वसुधा ठाकूर, तृप्ती कुलकर्णी, शलाका गरुड, योगेश देशमुख, विजय पाटील, यश सुर्वे आदी उपस्थित होते.

## बिल्डरवर गुन्हा दाखल

| पनवेल | वार्ताहर |

पनवेलच्या आकुर्ली भागात साई रेसिडेन्सी या नावाने इमारतीचे बांधकाम करणाऱ्या व्यावसायिकाने एका व्यावसायिकाकडून बांधकाम एका फ्लॅटच्या बुकिंगपोटी १८ लाख रुपये घेतले. त्या व्यावसायिकाला फ्लॅट अथवा त्याची रक्कमही परत न करता, त्याची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. भरत रामावत असे या बिल्डरचे नाव असून, खांदेश्वर पोलिसांनी त्याच्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.

भरतने २०१८ मध्ये मे. ओम साई बिल्डर्स अ‍ॅन्ड डेव्हलपर्स या कंपनीच्या वतीने पनवेलच्या आकुर्ली भागात साई रेसिडेन्सी या नावाने इमारतीच्या बांधकामाची जाहिरातबाजी केली होती. तुर्भे येथे राहणारे कपड्याचे व्यापारी नाथाराम चौधरी (६२) यांनी १८ लाख रुपये भरून गृहप्रकल्पातील फ्लॅटचे बुकिंग केले. त्यावेळी भरत रामावत याने सदर इमारतीचे बांधकाम पुढील वर्षात पूर्ण करुन बुकींगधारकांना फ्लॅटचा ताबा देण्याचे आश्वासन दिले होते.

## अपघातात सहा जण जखमी

| पनवेल | वार्ताहर |

निष्काळजीपणे भरधाव वेगात कार चालवताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने कार पदपथावरील सुरक्षा जाळीला धडकून अपघात झाल्याची घटना रात्री उशिरा मोठा खांदा येथील दोन ब्रिजच्या मध्ये जेएनपीटी रोडवर कामोठे येथे घडली.

या अपघातात कारमधील सहा जण जखमी झाल्याचे सांगण्यात आले आहे. या अपघाताप्रकरणी समशेर अन्सारी (रा. पनवेल) याच्याविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच या अपघातातील सर्व जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती कामोठे पोलिसांनी दिली आहे.

# नो एन्ट्रीमधून प्रवास करणाऱ्यांवर कारवाई

## साडेअठरा हजारांचा दंड वसूल

| कर्जत | प्रतिनिधी |

शहरात नो एन्ट्रीमधून प्रवास करणाऱ्यांवर कर्जत पोलिसांकडून कारवाई दंडात्मक कारवाईला सुरुवात झाली असून, दि. ३० आणि दि.३१ डिसेंबर अशा दोन दिवसांत ३७ केसेस करून १८,५०० दंड वसूल करण्यात आला आहे.

कर्जत शहरात होणाऱ्या वाहतूक कोंडीवर उपाययोजना करीत प्रशासनाकडून शहरात मुख्य बाजारपेठेत वनवे वाहतूक सुरू करण्यात आली आहे. वनवे वाहतूक सुरू केल्यापासून मोठ्या वाहनचालकांची बाजारपेठेत वाहन आणण्याची संख्या कामी झाली असल्याने वाहतूक कोंडी होत नसल्याचे दिसून येत आहे. मात्र, तरीही काही दुचाकी वाहनचालक नो एट्रीमधून प्रवास करत आहेत. त्यांच्यावर कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक पोलीस शाखेचे पोलीस हवालदार सुरेश पाटील अणि वाहतूक पोलीस हवालदार बाबसू तिडके यांनी ही धडक कारवाई केली आहे. या कारवाईमध्ये नो एन्ट्री प्रवास करणाऱ्या वाहनांचे लायसन तसेच वाहनांची इतर कागदपत्रे तपासण्यात आली आहे आहेत. या कारवाईमध्ये ३७ केसेस केल्या असून, रुपये १८ हजार ५०० इतका दंड वसूल करण्यात आला आहे. यामुळे चालकांचे धाबे दणाणले आहेत.



# लेखक लक्ष्मण अभंगे यांचे निधन

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील भडवळ येथील रहिवासी असलेले लक्ष्मण अभंगे तथा बंधू यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. काही महिन्यांपूर्वी त्यांच्यावर हृदयविकाराची शस्त्रक्रिया करण्यात आली होती. लेखक आणि मध्य रेल्वेचे प्रवाशांना सूचना देणारे अनाऊंसर म्हणून त्यांची ओळख होती.



भडवळ या गावात राहणारे लक्ष्मण अभंगे हे मध्य रेल्वेमध्ये नोकरीला होते. त्यांनी मध्य रेल्वेवरील अनेक स्थानकात अनाऊंसर म्हणून का पाहिले. त्यांची उद्घोषणा करण्याची पद्धत आगळीवेगळी अशी होती.२० वर्षांपूर्वी ते स्थानकात उद्घोषणा करताना रुळ ओलांडणे धोक्याचे आहे, आपला जीव महत्त्वाचा आहे, आपली घरी कोणी वाट पाहात आहेत असे बोलणे आणि त्यात लक्ष्मण अभंगे यांचा आवाज यामुळे त्यांची उद्घोषणा कायम स्मरणात राहिली आहे. लघु लेखक म्हणून त्यांनी साहित्य निर्मिती करण्याचा प्रयत्न केला.अनेक वर्तमानपत्रांमध्ये त्यांनी वाचकांची पत्रे आणि कथा लिहून छापून आली आहेत. काही महिन्यांपूर्वी त्यांच्यावर हृदयविकाराची शस्त्रक्रिया झाली होती.

### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री. अनिल दत्तात्रेय कडव यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक श्री. ॲशली ॲबी बरोज यांचेकडून विकत घेण्याचे ठरवीले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे. धोत्रे, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ३ | ६ | ०-५०-०० | ०-३४ |
| ७९ | २ | ०-२७-९० | १-३२ |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे

दि. ०१/०१/२०२५.

**ॲड. नरेश रामदास आहीर**
पत्ता - शॉप नं. १२, शिवगंगा अपार्टमेंन्ट, ब्राह्मणआळी, नेरळ
ता. कर्जत, जि. रायगड.
मो. - ९३२५०६००३७.

### नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद **मौजे सुरई, ता. मुरुड, जि. रायगड** येथिल मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक **सुचिता अजय सोडेकर** यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे त्यांच्यात बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण, वहिवाट इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटिस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे सुरई, ता. मुरुड, जि. रायगड**

| मौजे | भूमापन क्रमांक उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| सुरई, ता. मुरुड, | ६४/१ | क्षेत्र ०-७०-००<br>पो.ख. ०-०१-४०<br>एकूण क्षेत्र ०-७१-४० | १५.४० |

वर नमुद मिळकतीमधील सुचिता अजय सोडेकर यांच्या मालकीचे क्षेत्र ०-१४-९० हे.आर., पो.ख. ०-०१-४० हे. आर., एकूण क्षेत्र ०-१६-३० हे.आर.या मिळकतीपैकी क्षेत्र ०-०६-०० हे. आर. ही मिळकत.

दिनांक :- ०१/०१/२०२५

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड अलिबाग
ऑफिस पत्ता :- फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट,
जे. एस. एम कॉलेज जवळ अलिबाग रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

### जाहीर सुचना

सर्व संबधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे रेवदंडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील सर्व्हे नं. १०४, हिस्सा नंबर २अ/३, क्षेत्र ०-०५-५ (हे. आर), आकार रू. ५०-५० पैसे या बिनशेती मिळकतीवर विकसित केलेल्या नियोजित 'श्री चैतन्य अपार्टमेंन्ट', या इमारतीमधील, तिसऱ्या मजल्यावरील सदनिका क्र. ३०१, जिचा ग्रुप ग्रामपंचायत रेवदंडा कडील मालमत्ता क्र. ३३६६/१५, क्षेत्र ८३० चौ. फूट (बिल्टअप) (७७.१३ चौ.मी.) ही निवासी सदनिका सौ. मिनल मनोज कदम, राहणार हरेश्वर मंदिर, रेवदंडा, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या मालकीची असून, सदरील सदनिका, सदर सदनिकेच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर सदनिकेचे विद्यमान मालक व माझे अशिलादरम्यान झाली आहेत. सदर सदनिका पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर सदनिकेच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित सदनिकेत अन्य कोणाचेही कसल्याही तहेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून सात (०७) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर सदनिका खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : ३१/१२/२०२४

सही/
**(ॲड. संजय म. भगत)**
हिराबाग सोसायटी,अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदाराचे वकील

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे उमटे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची वरकस मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्रीमती. उज्ज्वला भालचंद्र चंदनशिव २) श्री. राजाराम मायाप्पा हुलवान ३) श्री. संदेश दामोदर चव्हाण यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

| मौजे | स. नं./हि.नं | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| उमटे | ९/८/२ | ०-९०-३० | १.६४ |
| | | पो.ख. ०-०२-७० | |
| | | ०-९३-०० | |

सदर मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : ०१/०१/२०२५

ॲड. माधवी नारायण ठाकूर.
सी-३०१, 'क्लिफ हेवन'
को. ऑप. हा. सोसायटी,
स्टेट बँक ऑफ इंडियाच्या बाजूला,
कोर्ट रोड, अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे-भोईघर, ता. मुरुड, जि. रायगड येथील खालील क्षेत्राचे वर्णनाची शेती जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक मंगेश कोंडीराम काते यांचे कडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौने | भूमापन क्र व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रु. पै) |
|---|---|---|---|
| भोईघर, ता. मुरुड | ३७४ | ००.२५.१० | ०२.०० |

वरील मिळकत नोटीसीचा विषय आहे.

वर वर्णन केल्या प्रमाणे क्षेत्राची जमिन मिळकती ह्या त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहिवाटीतील असून, त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्या बाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा तिचे कोणत्याही भागावार कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचाकरार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत आल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखीस्वरूपात आणून द्यावीत, मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकती विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काच्या आहेत व त्यावर अन्य कुणाचा ही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ३१/१२/२०२४
मंगेश कोंडीराम काते

**ॲड. राहुल रमेश नाईक**
मु. नागांव, ता. अलिबाग
मोबा. क्र. ९९२२७९८५२८

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे कुरूळ, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील भुमापन नंबर १०/२, एकूण क्षेत्र ६ - ५६ -०० आर. चौ.मीटर., आकार ६५.६० रू.पै. तसेच या मिळकतीतील ग्रुप ग्रामपंचायत कुरूळ हद्दीतील मालमत्ता क. २०४, क्षेत्र ५०० चौ. फुट, (४६ चौ. मीटर) मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक अतुल बाबाजी केळुस्कर रा. २०, लॉगव्हयू अवे, नॉर्थ वुडमेरे, न्यूयॉर्क, एनवाय ११५८, युएसए यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ३१/१२/२०२४

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राह्मण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

### तहसिलदार तथा शेतजमिन न्यायाधिकरण कर्जत यांचे न्यायालयात

**पत्ता : नवीन प्रशासकिय भवन, पहिला मजला, पोलिस मैदानाजवळ, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड-४१०२०१**

३२ ग दावा क्रमांक : टेनन्सी/एस आर/२२-२०२४

**जाहीर पेपर नोटीस**

१. श्रीम. आम्बी माया भस्मा
२. श्रीम. कुशी पांडु मेंगाळ
३. श्रीम. गुलाब हसु भस्मे
४. श्रीम. हिराबाई ज्ञानेश्वर मेंगाळ
५. श्रीम. अनुसया मंगल खैरे
६. श्रीम. नामी लखु कवटे
७. श्री. महादु मोरु भस्मे
८. श्री. कल्पेश विष्णु भस्मे — अर्जदार
९. श्रीम. यमुना चिंतामण शिंगवा
१०. श्रीम. शांती विष्णु भस्मे
११. श्रीम. कमल रामदास पिरकड
१२. श्री. राजु भगवान भस्मे
१३. श्रीम. निलम रविंद्र खंडवी
१४. श्रीम. कविता भगवान भस्मे
१५. श्रीम. मंगली भगवान भस्मे
१६. करण भगवान भस्मे

वरील सर्व रा.मु.कोंढाणे ता. कर्जत जि. रायगड,

विरूद्ध

१. श्री. गणेश प्रभाकर गोगटे — सामनेवाले
२. श्रीम. भागीरथी प्रभाकर गोगटे

रा. कोंढाणे ता. कर्जत जि. रायगड

**जमिनीचे वर्णन**

| तालुक्याचे नाव | गावाचे नाव | भुमापन क्र.(सर्व्हे नं.) | पोट हिस्सा क्रमांक | क्षेत्रफळ हे.आर.पॉ | ०.१४ |
|---|---|---|---|---|---|
| कर्जत | कोंढाणे | २८ | ९ | ०.१६.०० | ०.२३ |

अर्जदार यांनी तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण कर्जत यांचे न्यायालयात वरील जमिनीचे महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ चे कलम ३२ ग प्रमाणे खरेदी किंमत होणेकरीता तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण कर्जत यांच्या न्यायालयात दिनांक १४/०५/२०२३ रोजी अर्ज दाखल केला आहे.

तरी या दाव्यामध्ये हितसंबंध असलेल्या अर्जदार व सामनेवाले स्वतः किंवा त्यांचे अधिकृत वारस अगर प्रतिनिधी यांनी सुनावणीच्या दिवशी व वेळी आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह या न्यायालयात उपस्थित राहून काही सांगावयाचे असल्यास किंवा तिला हरकत दयावयाची असल्यास दिनांक १३/०१/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता ठिकाण कर्जत येथे शेतजमीन न्यायाधिकरणापुढे हजर होण्याविषयी आपणास (आपल्या विधिज्ञामार्फत) यावरुन फर्मावित आहे. जर नेमलेल्या वेळी व ठिकाणी न्यायाधिकरणापुढे हजर होण्याविषयी (विधीज्ञामार्फत) कसूर कराल तर त्याबाबतीत तुम्हांस काही ही सांगावयाचे नाही असे गृहीत धरण्यांत येईल आणि आवश्यक त्या चौकशीच्या कामात गैरहजेरीत सुरुवात करण्यांत येईल. व प्रकरणाच्या गुणतत्तेनुसार निर्णय दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण- कर्जत
दिनांकः १/१/२०२५

सही/-
**(धनंजय जाधव)**
**शेतजमिन न्यायाधिरण तथा तहसिलदार कर्जत**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे माणगांव तर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक धनंजय शहूराज समुद्रे यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ७२/३ | ०-२७-००<br>पो.ख. ०-०४-१०<br>एकुण ०-३१-१० | ०-२५ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०१/०१/२०२५

**ॲड. समीर आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - गाळा नं.०९,कोर्ट व्हयू बिल्डींग,
तळ मजला, दिवाणी व फौजदारी
न्यायालयासमोर, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

## निवडक



### तळवली संघाने पटकावले विजेतपद

**खांब :** रोहा तालुक्यातील कोलाड क्रिकेट असो. व अजय इलेव्हन खांब यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या विभागीय क्रिकेट स्पर्धेत जय हनुमान तळवली तर्फे अष्टमी या क्रिकेट संघाने विजेतपद पटकावले आहे. स्पर्धेतील अत्यंत रोमांचकारी ठरलेल्या अंतिम सामन्यात जय हनुमान तळवली तर्फे अष्टमी या क्रिकेट संघाने पाले खुर्द या संघाचा पराभव करून हे विजेतपद पटकावले आहे. संघाने मिळविलेल्या या सुयशाबद्दल तळवली तर्फे अष्टमी ग्रामस्थ व तरूण मंडळ तसेच विभागातील क्रिडा प्रेमी नागरिकांनी अभिनंदन व्यक्त करून शुभेच्छा दिल्या आहेत.



### मुंबईच्या पोराने सामना गाजवला

**अहमदाबाद :** भारतात सध्या विजय हजारे ट्रॉफी ही प्रथम श्रेणी देशांतर्गत क्रिकेट स्पर्धा सुरू सध्या साखळी फेरी सुरू आहेत. या स्पर्धेत मंगळवारी (दि.३१) मुंबई आणि नागालँड हे संघ आमने सामने आले होते. हा सामना मुंबईचा १७ वर्षीय फलंदाज आयुष म्हात्रेने गाजवला आहे. त्याने वादळी खेळ करत दीडशतक केले आहे. या सामन्यात मुंबईने अनेक प्रमुख खेळाडूंना विश्रांती दिली होती. कर्णधार श्रेयस अय्यर, सूर्यकुमार यादव, शिवम दुबे असे मुंबईचे महत्त्वाचे खेळाडू या सामन्यात खेळले नाही. श्रेयसच्या जागेवर शार्दुल ठाकूर मुंबईचे नेतृत्व करत होता. अहमदाबादमधील मोटेरा स्टेडियमवर होत असलेल्या या सामन्यात नागालँडने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे मुंबई संघ प्रथम फलंदाजीला उतरला. मुंबईकडून आयुष म्हात्रेसोबत अंगक्रिश रघुवंशीने सलामीला फलंदाजी केली. एका बाजूने अंगक्रिश संयमी खेळत असताना दुसऱ्या बाजूने आयुषने आक्रमक पवित्रा घेतला. त्यामुळे २५ षटकांच्या आतच मुंबईने १५० धावांचा टप्पा पार केला होता. दरम्यान, अंगक्रिशला ५६ धावांवर बाद झाला. त्यापाठोपाठ जय बिस्ता २ धावांवर बाद झाला. परंतु, नंतर आयुषला सिद्धार्थ लाडने चांगली साथ दिली. त्यांच्यातही तिसऱ्या बळीसाठी ९६ धावांची भागीदारी केली. परंतु, आयुष बाद झाल्याने ही भागीदारी तुटली. आयुषने या भागीदारीदरम्यान दीडशतक पूर्ण केले. त्याला नगाहोने बाद केले. आयुषने ११७ चेंडूत १५ चौकार आणि ११ षटकारांची बरसात करत १८१ धावांची खेळी केली. तो बाद झाल्यानंतर सूर्यांश शेडगे (५), सिद्धार्थ लाड (३९) आणि अथर्व अंकोलेकर (0) यांनी झटपट विकेट्स गमावल्या. पण नंतर प्रसाद पवार आणि शार्दुल ठाकूर यांच्यात ७२ धावांची भागीदारी झाली. तसेच त्यामुळे मुंबईने ३५0 धावांचा टप्पा सहज पार केला.



### वाडगांव येथे कुस्ती स्पर्धा संपन्न

**रेवदंडा :** रायगड जिल्हा कुस्तीगीर संघ, जय हनुमान तालीम संघ व ग्रामस्थ मंडळ वाडगाव यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि.२९) वाडगाव येथील कुस्ती प्रशिक्षण केंद्रात रायगड जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी कुस्ती स्पर्धा संपन्न झाली. स्पर्धेचे उद्घाटन माजी सरपंच सिताराम भगत, सरपंच सारिका पवार व सरिता भगत यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धा विविध वजन गटात घेण्यात आली. तसेच, प्रथम क्रमांकाने विजयी झालेल्या स्पर्धकांची राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.यावेळी, रायगड जिल्हा कुस्तीगीर संस्थेचे अध्यक्ष जयेंद्र भगत, माजी अध्यक्ष बळीराम पाटील, उपाध्यक्ष भगवान धुळे, सरचिटणीस मारुती आडकर, कार्याध्यक्ष सुभाष घासे, मधुकर भगत, सजना नाईक, ॲड. प्रसाद पाटील, सुनील पाटील, प्रसाद पाटील, नीलिमा भगत, गजानन पाटील, मुख्याध्यापक संतोष ठाकूर, अंशुमन राणे, हिरामण भोईर, गजानन हातमोडे तसेच अलिबाग तालुका कुस्तीगीर संस्थेचे उपाध्यक्ष कृष्णा भोपी, प्रमोद भगत, विलास पाटील व सर्व पदाधिकारी उपस्थित होते. तसेच, कुस्ती स्पर्धेसाठी पंच म्हणून श्रीराम पाटील, विष्णू पाटील, राजाराम कुंभार, वैभव मुकादम, सुनील नांदे, प्रसन्न पाटील, सावळाराम पायमोडे, रवींद्र घासे, सुधाकर पाटील, प्रवीण भोपी, जितेंद्र गावंड, भालचंद्र भोपी, योगेश गायकर, नाना राणे, श्रीराम दोंदल, यतीराज पाटील व रोशनी परदेशी यांनी काम पाहिले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी जय हनुमान तालीम संघाचे अध्यक्ष चंद्रकांत ठाकूर, उपाध्यक्ष गोपीनाथ ठाकूर यांच्यासह मंडळाचे अन्य सदस्य व सर्व ग्रामस्थांनी परिश्रम घेऊन स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडली.

### जसप्रित बुमराह जगात भारी

**नवी दिल्ली :** २०१४ हे वर्ष जसप्रीत बुमराहसाठी स्वप्नवत गेले आहे. फक्त भारतातच नाही तर जगभरातील अव्वल गोलंदाज म्हणून त्याने स्वत:ला सिद्ध केले. त्याच्यावर कर्णधाराची जबाबदारी आली तेव्हा तिथेही त्याने आपले कसब दाखवून दिले आणि गोलंदाजीत तर १३ कसोटींत १४.९२ च्या सरासरीने ७१ बळी मिळवत बुमराह जगात भारी ठरला. इंग्लंड विरुद्ध ४५ धावांत ६ बळी ही त्याची सर्वोत्तम कामगिरी ठरली. बुमराचे कामगिरीतील सातत्य वाखाणण्याजोगं ठरले आहे आणि त्याचा बळी मिळवण्याचा स्ट्राईकरेट ३०.१ हा जगात सर्वोत्तम ठरला आहे. षटकामागे २.९२ धावा मोजत त्याने

## मुंबई जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धा

# किशोरांची उपांत्यपूर्व फेरीत धडक

| मुंबई | प्रतिनिधी |

**मुंबई शहर कबड्डी असो.ने जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचे आयोजन वडाळा येथील भारतीय क्रीडा मंदिराच्या पटांगणावर करण्यात आले आहे. या स्पर्धेत विजय क्लब, आंबेवाडी क्रीडा, विजय बजरंग व्यायाम शाळा, समर्थ स्पोर्ट्स व एस.एस.जी. फाऊंडेशन यांनी १४वर्षाखालील मुलांच्या गटात उपांत्यपूर्व फेरी गाठली आहे.**



कबड्डीच्या अजिंक्यपद निवड चाचणीतील मुलांच्या सामन्यात विजय क्लबने चुरशीच्या लढतीत शिवनेरीचा प्रतिकार ५७-५३ असा मोडून काढला. पहिल्या डावात २७-२६ अशी आघाडी विजय क्लबकडे होती. आदित्य निशाद, अनुप यादव विजय क्लबकडून, तर श्रेयस घाटकर, प्रणव जाधव शिवनेरीकडून उत्कृष्ट खेळले. दुऱ्या सामन्यात आंबेवाडी मंडळाने वीर स्पोर्ट्सला ४४-४१ असे नमवित आगेकूच केली. विश्रांतीला २१-१८ अशी आघाडी आंबेवाडी कडे होती. विश्रांतीनंतर दोन्ही संघानी आक्रमक खेळ केल्याने विश्रांतीला असलेल्या गुणांच्या आघाडीवर आंबेवाडीने बाजी मारली. चैतन्य वाघवले, साईराज काळे यांनी आंबेवाडीकडून, तर हर्ष कांबळे, वेदांत महाजन यांनी वीर स्पोर्ट्सकडून चतुरस्त्र खेळ केला.

तिसऱ्या सामन्यात विजय बजरंग व्यायाम शाळेने यश क्रीडा मंडळाचा ७२-६२ असा पराभव केला. गुणांची लयलूट झालेल्या या सामन्यात मध्यांतराला ४६-३८ अशी आघाडी विजय बजरंगकडे होती. अर्णव अपराज, साई परीट यांच्या चढाई पकडीच्या झंझावाती खेळाने विजयासह गुणांचे अर्धशतक पार केले. आयुष खापरे, प्रथम पाटील यांनी यश मंडळाकडून कडवी लढत दिली. चौथ्या सामन्यात समर्थ स्पोर्ट्सने विजय नवनाथचा ४९-२५ असा पाडाव केला. देवदास गोरे, जॉय ढेबे यांच्या चढाई पकडीच्या खेळाने हा विजय साकारला. विजय नवनाथचा समर्थ गवाणकर चमकला.

पाचव्या सामन्यात एस.एस.जी. फाऊंडेशनने ओम् पिंपळेश्वरला ६०-३४ असे नमविले. पूर्वार्धात ३२-१८ अशी आघाडी एस.एस.जी.कडे होती. सार्थक भायडे, निखिल राठोड यांच्या चतुरस्त्र खेळाला या विजयाचे श्रेय जाते. ओम् पिंपळेश्वरकडून समर्थ कुडतरकर, स्मित खाडे बरे खेळले. इतर सामन्यात गोलफादेवीने ओम् श्री साईनाथचा ६०-३३ असा, जय भारत मंडळाने वारसलेनचा ६०-३५ असा, तर शिवशक्तीने श्री दत्तचा ६०-२७ असा पराभव करीत उपांत्यपूर्व फेरी गाठली आहे.

### हम्पीने पटकावले जागतिक जेतेपद

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारताची ग्रँडमास्टर कोनेरू हम्पी हिने इंडोनेशियाच्या इरेन सुकंदरचा पराभव करून दुसऱ्यांदा जागतिक जलद बुद्धिबळ स्पर्धेचे विजेतेपद पटकावले आहे. या विजयासह दुसऱ्यांदा वर्ल्ड रॅपिड चॅम्पियनशिपचे विजेतेपद पटकावणारी ती भारतातील पहिली महिला बुद्धिबळपटू ठरली आहे. तसेच, आंतरराष्ट्रीय स्तरावर अशी कामगिरी करणारी ती दुसरी बुद्धिबळपटू ठरली आहे. ३७ वर्षीय हम्पीने ११ पैकी ८.५ गुणांसह स्पर्धा पूर्ण केली आणि यासह विजेतेपद पटकावले आहे. अंतिम फेरी सुरू होण्यापूर्वी सहा खेळाडू ७.५ गुणांसह कोनेरू हम्पीसोबत संयुक्तरित्या पहिल्या क्रमांकावर होते. या खेळाडूंमध्ये जू वेनझुन, कॅटरिना लागनो, हरिका द्रोणावल्ली, अफरोजा खामदामोवा, टॅन झोंग्यी आणि इरीन या खेळाडूंचा समावेश होता. विशेष म्हणजे या सर्व खेळाडूंचे सामने अनिर्णित सुटले, परंतु हम्पीने इंडोनेशियाच्या इरिन सुकंदरचा अंतिम फेरीत पराभव केला आणि विजेतेपद सुद्धा पटकावले आहे.

## महाराष्ट्र संघातील खेळाडूंची घोषणा

### राष्ट्रीय ॲथलिट स्पर्धेत सहभाग



| नेरळ | प्रतिनिधी |

राज्य ॲथलिट स्पर्धेतून राष्ट्रीय ॲथलिटसाठी निवड झालेल्या खेळाडूंमध्ये कर्जत तालुक्यातील माथेरान व्हॅली स्कुलमधील १० खेळाडूंचा तर कर्जत शहरातील २१ खेळाडूंचा सहभाग असणार आहे.

राष्ट्रीय ॲथलिट अजिंक्यपदासाठी निवड चाचणी घेण्यात आली होती. त्या निवड चाचणीमध्ये यशस्वी झालेल्या खेळाडूंची निवड राष्ट्रीय ॲथलिट स्पर्धेसाठी झाली आहे. त्यात कर्जत तालुक्यातील माथेरान व्हॅली स्कूलच्या १० आणि कर्जत शहरातील शारदा मंदिर शाळेच्या २१ खेळाडूंची राष्ट्रीय ॲथलेटिक्स स्पर्धेत निवड झाली असून आगामी नवीन वर्षात ही राष्ट्रीय स्पर्धा नाशिक जिल्ह्यात होणार आहे. त्यात माथेरान व्हॅली स्कुलमधील खुशी द्विवेदी, खुशबू द्विवेदी, निधी जोईल, वैदेही जाधव, वैष्णवी भोये, पूजा दातेला, अजित सुपे, कुंजय खांजोडे, चारुळ शिंदे, श्वेता खोखले यांची निवड राष्ट्रीय स्पर्धेसाठी करण्यात आली आहे. तसेच, कर्जत शहरातील शारदा मंदिर शाळेचे विनंती खडके, जिजा पिंपरकर, मांदिका प्रसाद, सुमित चौधरी, प्राजक्ता खोडके, गणेश ठाकूर, भाविका बोराडे, हरेश ठाकूर, विहान पेरणेकर, अनिकेत गौड, सोनकुमार मुखिया, आर्या पारधी, हर्षल ठाकरे हे सुवर्णपदक मिळविणारे खेळाडू तसेच प्रणय हिंदोळा, धनराज ठाकरे, सुरेश कुमार, माही चौधरी, मयूर जाधव, आर्यन पजे, कबीर गायकवाड यांचा समावेश आहे.

### ‘मोहम्मद सिराजला संघातून वगळा’

**मुंबई :** बॉक्सिंग डे मालिकेतील खराब कामगिरीमुळे माजी क्रिकेटपटू सुनील गावसकर मोहम्मद सिराजवर चिडले आहेत. त्याच्या कामगिरीचे नीट मूल्यमापन करा. गरज पडल्यास त्याला सिडनी कसोटीतून वगळा, असे गावसकर यांनी म्हटले आहे. मागच्या ७ डावांमध्ये सिराजने फक्त १३ बळी मिळवेल आहेत. नवीन चेंडू हाताळताना त्याच्या गोलंदाजीत ती धारही दिसलेली नाही. त्यामुळे सगळ्यात मोठा परिणाम जसप्रीत बुमरावर झाला आहे. शिवाय सिराजने या मालिकेत षटकामागे ४ धावांच्या गतीने धावा लुटल्या आहेत. जेव्हा एखादा खेळाडू इतका निष्प्रभ ठरत असेल तेव्हा खेळाडूला समज देण्याची गरज असते, असे गावसकर यांना वाटत आहे.

## क्रिकेट स्पर्धेत ‘गुडलक’ची बाजी



| अलिबाग | वार्ताहर |

जय हनुमान परहूरपाडा संघाने दि. २७, २८ व २९ डिसेंबर रोजी तीन दिवसीय किकेट स्पर्धेचे आयोजन केले होते. या सामन्याचे उद्घाटन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी गावातील जेष्ठ मंडळी उपस्थित होती. या स्पर्धेत २४ नामांकित साघांनी भाग घेतला होता. या तीन दिवशीय किकेट सामन्यात अंतिम सामना गुडलक किकेट संघ आणि जखमाता किकेट संघ परहूरपाडा या संघात झाला. त्यात गुडलक संघानी बाजी मारत प्रथम क्रमांक पटकवला आहे. तसेच, द्वितीय क्रमांक जखमाता परहूरपाडा, तर तृतीय क्रमांक जय हनुमान परहूर पाडा संघानी पटकावला आहे. या स्पर्धेतील मालिकावीर म्हूणन सुमित पाटील याला गौरविण्यात आले. तर, उत्कृष्ट फलंदाज म्हूणन राज गुंजाळ, तर उत्कृष्ट गोलंदाज म्हणून पार्थ घरत याला गौरविण्यात आले.



अलिबाग तालुक्यातील हाशिवरे येथे आयोजित किकेट स्पर्धेत गुडलक किकेट संघाने चतुर्थ क्रमांक पटकावला आहे. या सामन्यात उत्कृष्ट फलंदाज म्हूणन सिद्देश पाटील यांला गौरविण्यात आले.



श्री माँ बाल निकेतन विद्यालयातर्फे घेण्यात आलेल्या ‘तेजस’ या ३० व्या इंटर स्कूल स्पर्धेतील मेहंदी स्पर्धेत न्यू गर्ल्स स्कूल अँड ज्युनियर कॉलेज इ. १२ वी ‘अ’ मधील विद्यार्थिनी वीणा महिपत कदम (पाली-सुधागड) हिने ठाण्यातील सहभागी असलेल्या सर्व शाळा व कॉलेजमधून प्रथम क्रमांक पटकावला आहे. याबद्दल तिचे सर्व स्तरातून कौतूक होत आहे.

## कुमार-कुमारी राज्य अजिंक्यपद निवड चाचणी | उप उपांत्यपूर्व फेरीत रंगले थराराक सामने

# सांगलीची उपांत्यपूर्व फेरीत धडक

| सांगली | प्रतिनिधी |

महाराष्ट्र राज्य कबड्डी असो.च्या मान्यतेने व युवक मराठा मंडळाच्या सहकार्याने सांगली जिल्हा कबड्डी असो.तर्फे ५१व्या कुमार-कुमारी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचे आयोजन सांगलीतील सांगलीवाडी येथील चिंचबाग मैदानावर करण्यात आले आहे. या स्पर्धेत यजमान सांगलीसह नंदुरबार, कोल्हापूर, पुणे यांनी कुमार गटाची उपांत्यपूर्व फेरी गाठली आहे.



कुमार गटाच्या स्पर्धेतील उप उपांत्यपूर्व सामन्यात सांगलीने चुरशीच्या लढतील पुणे शहरचा प्रतिकार ३९-३७ असा मोडून काढत आगेकूच केली आहे. पूर्वार्धात लोण देत २०-१० अशी आघाडी घेणाऱ्या सांगलीला उत्तरार्धात पुण्याने चांगलेच झुंजविले होते. उत्तरार्धात पुणेकरांनी आपला खेळ उंचावत खेळातील रंगत वाढविली. शेवटच्या मिनिटात लोण देत पुण्याने ३६-३७ अशी आघाडी कमी केली. मात्र, सांगलीच्या आदित्य येसगुडे, ओम् शिंदे, हर्षद पाटील यांनी उत्कृष्ट खेळ करीत सामना आपल्या हातून निसटणार नाही याची काळजी घेत २ गुणांनी विजय साकारला.

दुसऱ्या सामन्यात नंदुरबारने रत्नागिरीला ३२-२६ असे नमविले. सुरुवात आक्रमक करीत २ लोण देत नंदुरबारने विश्रांतीला २३-१० अशी आघाडी घेतली. विश्रांतीनंतर रत्नागिरीला सुर सापडल्याने त्याने लोणची परतफेड करीत सामना रंगतदार अवस्थेत नेला. असीम शेख, रोशन चिपळूणकर यांच्या चतुरस्त्र खेळाने नंदुरबारने विजयाला गवसणी घातली. रत्नागिरीच्या अभिषेक शिंदे, अथर्व पाडावे यांचा खेळ रत्नागिरीला विजयी करण्यात व्यर्थ ठरला. तिसऱ्या सामन्यात कोल्हापूरने अहमदनगरचे आव्हान ३१-२० असे संपविले. मध्यांतराला लोण देत १७-०८ अशी आघाडी घेणाऱ्या कोल्हापूरने नंतर देखील खेळातील जोश कायम राखत आपला विजय सोपा केला. समर्थ देशमुख, सुहास मोहिते यांच्या चढाई पकडीच्या झंझावाती खेळाला या विजयाचे श्रेय जाते. अहमदनगरचा आशिष वाघ एकाकी लढला. पुणे ग्रामीणने बीडचा ३४-२६ असा पाडाव केला. अनुज गावडे, अर्जुन दडास यांच्या चतुरस्त्र खेळाने पूर्वार्धात १५-०९ अशी आघाडी घेणाऱ्या पुण्याने उत्तरार्धात सावध खेळ करीत आपल्या विजयावर शिक्कामोर्तब केले. बीडचा रोहित राठोड चमकला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)